सत्यमेव जयते

इतर मागासवर्ग कल्याण समिती

(२०१५-२०१६)
(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

(बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, जळगाव-जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद तसेच जिल्हा परिषद, राज्य मार्ग परिवहन महामंडळ जिल्हाधिकारी, जिल्हा बुलढाणा या कार्यालयातील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल)

पहिला अहवाल

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनाक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१६

इतर मागासवर्ग कल्याण समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

(बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, जळगाव-जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद तसेच जिल्हा परिषद, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा बुलढाणा या कार्यालयातील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल)

पहिला अहवाल

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनाक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

इतर मागासवर्ग कल्याण समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) डॉ.संजय कुटे, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ.पंकज भोयर, वि.स.स.
(३) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
(४) श्री.राजेश काशिवार, वि.स.स.
(५) श्री.अतुल सावे, वि.स.स.
(६) श्री.ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(७) श्री.नागेश पाटील-अष्टीकर, वि.स.स.
(८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(९) श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स.
(१०) श्री.सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स.
(११) श्री.क्षितीज ठाकूर, वि.स.स.
(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
(१३) श्री.रामराव वडकुते, वि.प.स.
(१४) ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स.
*(१५) रिक्त

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. ना.रा.थिटे, उप सचिव,
(३) श्री. सुनिल झोरे, अवर सचिव(समिती),
(४) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

---

* (श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांची दिनांक ७ जुलै २०१६ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपली असल्याने पद रिक्त)

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	विषय		पृष्ठ क्रमांक
(१)	(२)		(३)
(१)	प्रस्तावना	...	(सात)
(२)	अहवाल	...	१
(३)	परिशिष्ट (समितीच्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त)	...	३१

प्रस्तावना

मी, इतर मागासवर्ग कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून नगरविकास, ग्रामविकास, सामाजिक न्याय, गृह (परिवहन) व महसूल विभागांतर्गत येणाऱ्या शेगाव, जळगाव-जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संदर्भात समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

इतर मागासवर्ग कल्याण समितीने बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, जळगाव-जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद, जिल्हा परिषद, बुलढाणा प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाजकल्याण विभाग बुलढाणा, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सेवेतील इतर मागास प्रवर्गाचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सदर प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती घेऊन अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रश्नावलीच्या स्वरूपात विभागाकडून माहिती मागविण्यात आली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २९ जून २०१५ रोजी शेगाव, जळगाव-जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद कार्यालयास भेट देऊन तेथील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. तसेच दिनांक ३० जून २०१५, रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बुलडाणा विभाग, बुलडाणा, जिल्हा परिषद, बुलढाणा, प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाजकल्याण विभाग, बुलढाणा आणि जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन तेथील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग महाव्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, यांची साक्ष घेतली. समितीस प्राप्त झालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांनी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने या अहवालात अभिप्राय व शिफारशी केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहाकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०१६.

संजय कुटे,
समिती प्रमुख,
इतर मागासवर्ग कल्याण समिती.

अहवाल

शेगाव नगरपरिषद, जिल्हा बुलढाणा

समितीने शेगाव नगरपरिषदेस दिनांक २९ जून, २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन नगरपरिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. शेगाव नगरपरिषदेमध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

शेगाव नगरपरिषदेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या पदासंदर्भात समितीने माहिती विचारली असता मुख्याधिकारी यांनी सांगितले की, वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे शेगाव नगरपरिषदेमध्ये नाहीत. वर्ग-३ मध्ये ५८ पदे (२० तांत्रिक व ३८ अतांत्रिक) व वर्ग ४ मध्ये ७४ पदे (४ तांत्रिक व ७० अतांत्रिक) आहेत. त्यामध्ये इतर मागासवर्गीयाची पदे आरक्षणानुसार करण्यात आली आहेत.

समितीने बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी केली असता मागील ५ वर्षांमध्ये इतर मागास प्रवर्गाची पदे भरण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले त्यासंदर्भात मागासवर्ग कक्षाकडून समितीस सांगण्यात आले की, दिनांक ५ नोव्हेंबर २००९ च्या परिपत्रकानुसार लहान संवर्गाकरिता प्रपत्र-ब मध्ये आरक्षण निश्चित करून दिली आहेत. त्यानुसार एकाकी पदासाठी आरक्षण लागू होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गातील पदे रिक्त झाल्यानंतर आळीपाळीने अनुसूचित जाती व जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि त्यानंतर विशेष मागास प्रवर्गातून भरली जातात. तसेच शेगाव नगरपरिषदेचा जकात नाका बंद झाल्यामुळे लिपिक व सफाई कामगार संवर्गाची कर्मचारी अतिरिक्त ठरल्यामुळे सदर पदांची भरती करण्यात आली नाही.

बिंदूनामावली नोंदवही ३ वर्षांमध्ये तपासणी करणे आवश्यक असताना बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी का केली नाही अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, बिंदू नामावली नोंदवही दिनांक ११ नोव्हेंबर २०१० रोजी अद्ययावत करण्यात आली असून सन २०१५ मध्ये बिंदू नामावलीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यानुसार बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करून घेण्यात येईल.

शेगाव नगरपरिषदेमध्ये अस्थायी कर्मचाऱ्यांची भरती मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली असता मुख्याधिकारी यांनी माहिती दिली की, स्थायी पदांची नियुक्ती झाल्यानंतर अस्थायी पदे भरण्यात आली आहेत. ही पदे मंजूर आकृतीबंधानुसार संवर्गनिहाय भरण्यात आलेली आहेत. मागासवर्गीयांना शासन निर्णयानुसार संवर्गनिहाय आरक्षण दिले जाते.

नगरपरिषदेअंतर्गत किती शाळा आहेत व सदरहू शाळांमध्ये किती पदे मंजूर आहेत असे समितीने विचारले असता, मुख्याधिकारी यांनी स्पष्ट केले की, नगरपरिषदेअंतर्गत ८ मराठी माध्यम आणि ३ उर्दू

माध्यम अशा ११ शाळा आहेत. मराठी माध्यम शाळेसाठी ३४ पदे मंजूर असून त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाकरिता ७ पदे आरक्षित असून ४ पदे अतिरिक्त आहेत. उर्दू माध्यम शाळेसाठी ३३ पदे मंजूर असून त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाकरिता ६ पदे आरक्षित आहेत. त्यापैकी एक पद रिक्त आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरती करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात येऊन संच मान्यता मिळाली. तथापि, सदर संच मान्यतेविरुध्द काही व्यक्ती न्यायालयात गेल्यानंतर त्यास स्थगिती देण्यात आली आहे.

इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या कल्याणाकरिता नगरपरिषदेने अर्थसंकल्पामधून एखादी विशेष योजना राबविण्यात यावी असे समितीने सूचित केले असता मुख्याधिकारी यांनी स्पष्ट केले की, समितीने केलेल्या सूचनेनुसार नगरपरिषद सभागृहात सदर विषय उपस्थित करण्यात येऊन त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी नगरविकास विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शेगाव नगर परिषदेने माहे नोव्हेंबर २०१० नंतर बिंदूनामावली रजिस्टरची तपासणी का केली नाही, सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ यावर्षांची संच मान्यता केव्हा प्राप्त झाली, तसेच सक्षम प्राधिकारी यांचेकडून बिंदूनामावली प्रमाणित प्रत केव्हा करून घेतली आहे. त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी मागास वर्ग कक्ष यांचेकडे बिंदूनामावली तपासणीकरिता सादर केली असता त्यामध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या तथापि, सदरहू त्रुटींची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल लवकरच मागासवर्ग कक्षाकडे पाठविण्यात येईल.

सन २०१४-१५ चा ऑनलाईन संच मान्यता प्रस्ताव प्रमाणित करण्यात आला आहे काय अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २०१२-१३ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या ४ कर्मचाऱ्यांचे समायोजन करून संच मान्यता प्रस्ताव सादर करण्यात येईल. तथापि, सन २०१४-१५ च्या संच मान्यता प्रस्तावाची ऑनलाईन प्रक्रिया सुरू व्हावयाची आहे.

शेगाव नगर परिषदेंतर्गत सन २०१३-१४ मध्ये उर्दू माध्यमाच्या संच मान्यतेनुसार पदवीधर शिक्षकांची मंजूर १० पदे समायोजनाने मिळणेबाबतची मागणी करूनही शिक्षक मिळाले नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उर्दू माध्यमांच्या शिक्षकांच्या संदर्भातील संच सन २०१४-१५ मध्ये मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. तसेच मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये पटसंख्या कमी झाल्यामुळे जुन्या संच मान्यतेनुसार शिक्षकांची अतिरिक्त पदे झाली आहेत. तथापि, नवीन कायद्यानुसार ती कमी झाले आहेत. संच मान्यतेनंतर त्या पदांचे समायोजन करण्यात येईल.

इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता नगरपरिषदेने अर्थसंकल्पातून एखादी विशेष योजना राबविण्याबाबत नगरपरिषदेमध्ये ठराव मंजूर करून घेण्याबाबत व त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे, तसेच पुरवणी अंदाजपत्रक केव्हा सादर करण्यात येणार आहे व त्यामध्ये कोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, इतर मागासवर्गीयांसाठी २५ लाखांची तरतूद केलेली आहे. स्थायी समितीची बैठक दिनांक १४ जानेवारी

२०१६ रोजी झालेली आहे आणि दिनांक २७ फेब्रुवारी २०१६ रोजी सर्वसाधारण बैठक घेण्यात येणार आहे. योजनेमध्ये वैयक्तिक स्वयंरोजगाराची प्रकरणे असून त्यामध्ये ड्रायव्हिंग, पिशव्या बनविणे इ. अभ्यासक्रम आहे व त्याबाबतचे प्रशिक्षण त्यांना देण्यात येईल.

शेगाव नगरपरिषदेमध्ये ३२ कर्मचाऱ्यांचे वय जास्त असल्यामुळे त्यांचा क्षमापनाच्या प्रलंबित प्रस्तावास केव्हापर्यंत मंजुरी मिळेल असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर ३२ कर्मचाऱ्यांपैकी २८ कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाने १८ फेब्रुवारी २०१६ रोजी मान्य केल्याबाबतचे पत्र विभागास प्राप्त झाले असून त्यामध्ये काही तांत्रिक त्रूटी आहेत. सदरहू तांत्रिक त्रुटींची लवकरच पूर्तता करण्यात येईल.

जळगाव जामोद नगर परिषद, जिल्हा बुलढाणा

समितीने जळगाव जामोद नगरपरिषदेस दिनांक २९ जून २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देवून नगरपरिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. जळगाव जामोद नगरपरिषदेमध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच जळगाव जामोद नगरपरिषदेच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

नगरपरिषदेतील वर्ग-१ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या पदासंदर्भात समितीने माहिती विचारली असता मुख्याधिकारी यांनी सांगितले की, जळगाव जामोद नगरपरिषदेमध्ये वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे नाहीत. वर्ग-३ मध्ये २६ (९ तांत्रिक व १७ अतांत्रिक) पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे राज्यस्तरीय संवर्गातील आहेत. वर्ग-३ मधील १३ पदे भरण्यात आली असून १३ पदे रिक्त आहेत. १३ पदापैकी ४ पदे इतर मागास प्रवर्गाची आहेत. वर्ग-४ मध्ये ३३ पदे असून ती अतांत्रिक स्वरूपाची आहे. त्यापैकी २७ पदे सफाई कामगारांची आहेत. वर्ग-४ मध्ये इतर मागास प्रवर्गाचे एक पद भरले आहे. उर्वरित पदे भरण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली असून त्यांची अद्यापपर्यंत परवानगी मिळालेली नाही. अनुकंप तत्वावरील पदे शासन निर्णयानुसार भरण्यात येतात. सदरहू पदे भरतांना नगरपरिषदेत ठराव मंजूर झाल्यानंतर त्या बाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार पुढील कार्यवाहीकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला जातो. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सरळसेवेने नगरपरिषद राज्यसंवर्गातील इतर मागास प्रवर्गामधील विद्युत पर्यवेक्षकाचे १ पद भरण्यात आले असून वर्ग-४ मध्ये इतर मागास प्रवर्गातील एक पद अनुकंप तत्वावर भरण्यात आले आहे.

सन २००० मध्ये मागासवर्ग कक्षाकडून बिंदू नामावली तपासून मंजूर केली आहे असे विभागीय अधिकारी यांनी सांगितले असता त्यावर समितीने सूचना केली की, सन २००० साली बिंदू नामावली मागासवर्ग कक्षाकडून तपासली असल्याने यापुढे दर ३ वर्षांनी मागासवर्ग कक्षाकडून बिंदू नामावली तपासून घेणे अत्यावश्यक आहे तसेच बिंदू नामावली तयार करून एक आठवड्यात पुढील कार्यवाही करावी.

जळगाव जामोद नगरपरिषदेच्या अंतर्गत किती शाळा आहेत व सदर शाळेत किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी इतर मागास प्रवर्गाकरिता किती पदे आरक्षित आहेत, ती पदे भरली आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, नगरपरिषदेअंतर्गत ४ मराठी माध्यम, ३ उर्दू माध्यम आणि एक मुलींचे माध्यमिक हायस्कूल अशा एकूण ८ शाळा आहेत. मराठी शाळेत १९ पदे मंजूर असून १ पद रिक्त आहे. माध्यमिक हायस्कूलमध्ये ९ पदे मंजूर असून ४ पदे रिक्त आहेत व १ पद इतर मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असून सदर पद भरले आहे. उर्दू शाळेतील ९ पदे रिक्त आहेत. जिल्हा निवड समितीच्या आदेशानुसार सदर शाळेतील शिक्षकांचे जोपर्यंत समायोजन होत नाही, तो पर्यंत भरती केली जाणार नाही. तसेच नगरपरिषदेतील प्रशासन अधिकाऱ्याचे पद २ वर्षांपासून रिक्त असून त्यासंदर्भात २-३ वेळा आदेश झाले होते. परंतु संबंधित अधिकारी कामावर रुजूर होत नसल्याने त्यासंदर्भातील माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी नगरविकास विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जळगाव जामोद नगरपरिषदेमधील वर्ग-३ च्या रिक्त पदांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक १ एप्रिल, २०१६ पर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

अग्निशमनची वर्ग-२ ची पदे शासनाकडून केव्हा भरण्यात येणार आहेत असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक १ एप्रिल, २०१६ पूर्वी अग्निशमन पदाचीही भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यावर समितीने निदर्शनास आणले की, पदवी असलेले अधिकारी मोताळा, बुलढाणा, संग्रामपूर अशा तालुक्याच्या ठिकाणी येणार नाहीत कारण की, नागपूर, पुणे, मुंबई यासारख्या शहराच्या ठिकाणी ते कमी पडत आहेत. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी अग्निशमन पदविका (फायर डिप्लोमा) ग्राहय धरण्यात यावा असे समितीने सूचित केले असता त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू प्रस्तावाची नस्ती सादर करण्यात आली असून उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे अग्निशमन संचालनालयाचा ६ महिन्याचा जो अभ्यासक्रम आहे तो पात्रता म्हणून सुचविण्यास आला आहे. पण नियमातील तरतूदीमध्ये बदल करावा लागणार आहे. यापूर्वी दोन वर्षाचा अग्निशमन पदविका (फायर डिप्लोमा) अभ्यासक्रम असल्यामुळे उमेदवार मिळण्यास अडचणी उद्‌भवत होत्या त्यामुळे आता सहा महिन्यांचा डिप्लोमाचाही समावेश त्यामध्ये केलेला आहे. सदरहू पदाची भरती प्रक्रिया चालू असून दिनांक १ एप्रिलपर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच वर्ग-४ ची महिला अग्निशमनची पदेही भरण्यात येणार आहेत. अग्निशमन विभागातील उप अधिकारी यांची पदे भरण्यास अडचण येत होती ती लवकरच दूर करण्यात येईल. याबाबतही प्रस्तावामध्ये समावेश केलेला आहे.

जळगाव जामोद नगरपरिषदेमध्ये सन २००४ नंतर बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी का करण्यात आली नाही. अद्ययावत बिंदू नामावली तयार करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, असल्यास त्यात काय त्रुटी आढळून आलेल्या आहेत तसेच त्या दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे अशी समितीने विचारणा केली असता, याबाबतची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत कळविण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी आश्वासन दिले.

जळगाव जामोद नगरपरिषदमध्ये प्रशासन अधिकाऱ्यांचे पद रिक्त असून या संदर्भात २-३ वेळा आदेश होऊनही संबंधित उमेदवार कामावर रुजू होत नसल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले व अशा अधिकाऱ्यांविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती समितीस द्यावी असे निदेश दिले.

मलकापूर नगर परिषद, जि.बुलढाणा

समितीने मलकापूर नगरपरिषदेस दिनांक २९ जून, २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देवून नगरपरिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. मलकापूर नगरपरिषदेमध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच मलकापूर नगरपरिषदेच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

मलकापूर नगरपरिषदेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या पदासंदर्भात समितीने माहिती विचारली असता मुख्याधिकारी यांनी स्पष्ट केले की, मलकापूर नगरपरिषदेमध्ये वर्ग १ व वर्ग २ ची पदे नाहीत. वर्ग-३ मध्ये ५५ (अतांत्रिक ३३ व तांत्रिक २२) पदे असून त्यापैकी २० पदे ही नगरपरिषद राज्य संवर्गातील आहेत. सन २०१२ ते २०१५ अखेरपर्यंत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या नियुक्ती आदेशान्वये सरळसेवेने नगर परिषद राज्य संवर्गातील ५ पदे भरण्यात आली आहेत तसेच अतांत्रिक मधील ३३ पदापैकी इतर मागास प्रवर्गाची ३ पदे व तांत्रिकमधील २२ पदापैकी इतर मागास प्रवर्गाची २ पदे भरण्यात आली आहेत. वर्ग-४ मध्ये ८२ (अतांत्रिक ७८ व तांत्रिक ४) पदे असून त्यापैकी ६१ पदे सफाई कामगारांची आहेत. वर्ग ४ मध्ये इतर मागास प्रवर्गाची २ पदे राखीव होती परंतू ३ पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळे इतर मागास प्रवर्गाची पदे रिक्त नसून जादा पदे भरण्यात आली आहेत.

बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी केव्हा करण्यात आली आहे असे समितीने विचारले असता मुख्याधिकारी यांनी असे सांगितले केले की, बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी सन २०१० मध्ये करण्यात आली आहे. इतर मागास प्रवर्गातील तसेच इतर कर्मचाऱ्यांची पदे शासन परिपत्रकानुसार भरण्यात येतात. वर्ग ३ करिता जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, निवड मंडळ बुलढाणा यांचेमार्फत पद भरती करण्यात येते. वर्ग ४ करिता सेवा नियोजन कार्यालयाकडून यादी मागवून व दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देवून नियमानुसार भरती करण्यात येते. नगरपरिषदेत अनुशेष शिल्लक नाही. सन २०१० पासून पदांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. फक्त ३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेल्या आहेत. नगरपरिषदेत जी पदे भरली आहेत, त्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मान्यता घेतली आहे. बिंदू नामावली तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. एक महिन्याच्या कालावधीत मागासवर्ग कक्षाकडे बिंदू नामावली तपासण्याकरिता पाठविली जाईल.

नगरपरिषदेच्या अखत्यारित एकूण किती गाळे आहेत, त्यापैकी इतर मागासवर्ग प्रवर्गातील किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असे विचारले असता, नगरपरिषदेच्या अखत्यारित एकूण ३१ गाळे आहेत, त्यापैकी इतर मागास प्रवर्गातील एका लाभार्थ्यांला गाळा वाटप करण्यात आला. तसेच ८५ घरकुलांकरिता १ कोटी १२ लाख ८६ हजार रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. त्यापैकी ४० घरकुले इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना वाटप केली आहेत.

नगरपरिषदेच्या अंतर्गत किती शाळा आहेत व तेथे किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी इतर मागास प्रवर्गाकरिता किती पदे आरक्षित आहेत अशी समितीने विचारणा केली असता, मुख्याधिकारी यांनी विदित केले की, नगरपरिषदेच्या अंतर्गत १३ शाळा आहेत. मराठी शाळेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या एकूण ५९ मंजूर पदांपैकी इतर मागास प्रवर्गाकरिता ८ पदे आरक्षित असून सदर पदे भरली आहेत. उर्दू शाळेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या ४२ मंजूर पदांपैकी ३६ पदे भरली आहेत. तसेच मराठी हायस्कूलमधील इतर मागास प्रवर्गातील सर्व पदे भरण्यात आली आहेत.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी नगरविकास विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दर तीन वर्षांनी बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक असताना मलकापूर नगर परिषदेकडून सन २००० नंतर बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी का करण्यात आली नाही. त्यावेळी काही त्रुटी आढळून आल्या होत्या काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे व सदरहू त्रुटी दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली त्याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१० मध्ये बिंदूनामावलीची तपासणी करण्यात आली असून त्यास मान्यता मिळाली आहे. दिनांक २० फेब्रुवारी २०१६ रोजी पुन्हा बिंदूनामावलीची तपासणी करण्यात आली आहे. इतर मागास प्रवर्गातील अनुषेश शिल्लक नाही.

मलकापूर नगरपरिषदेने वर्ग ३ व ४ च्या नवीन पदांचा आकृतीबंध दिनांक १७ फेब्रुवारी २००६ रोजी नगर पालिका प्रशासन, मुंबई यांचेकडून मंजूर करून घेऊनही बिंदूनामावली तपासणीकरिता सन २००९ मध्ये प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे काय अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी विषद केले की, आरक्षण व इतर माहिती संदर्भातील त्रुटींची पूर्तता करण्याबाबतच्या कार्यवाहीमुळे उशीर झाला आहे. तसेच बिंदूनामावली तपासण्यासंदर्भातील विलंबाप्रकरणीची माहिती समितीला सादर करण्याचे निदेश संबंधिताना देण्यात येतील.

बुलढाणा नगर परिषद, जिल्हा बुलढाणा

समितीने बुलढाणा नगरपरिषदेस दिनांक २९ जून, २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देवून नगरपरिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. बुलढाणा नगरपरिषदेमध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच बुलढाणा नगरपरिषदेच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

बुलढाणा नगरपरिषदेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या पदासंदर्भात समितीने माहिती विचारली असता मुख्याधिकारी यांनी स्पष्ट केले की, बुलढाणा नगरपरिषदेमध्ये वर्ग १ व वर्ग २ ची पदे नाहीत. वर्ग-३ मध्ये ५९ व वर्ग-४ मध्ये ८१ पदे मंजूर आहेत. वर्ग ३ च्या मंजूर ५९ पदामध्ये इतर मागास प्रवर्गाची ३ पदे राखीव होती ही तीनही पदे भरण्यात आली आहेत. सरळसेवेची १५ पदे मंजूर होती त्यापैकी ३ इतर मागास प्रवर्गाची पदे भरण्यात आली आहेत. सन २०१२ ते २०१५ या कालावधीत वर्ग ४ मधील ११ पदापैकी शिपाई प्रवर्गाची २ पदे व सफाई कामगारांची ९ पदे अनुक्रमे अनुकंपा व वारसाहक्काने भरण्यात आली आहेत. वर्ग ४ मधील इतर मागास प्रवर्गाची पदे भरण्यात आली आहेत.

बिंदूनामावली नोंदवहीची मान्यता घेण्यात आली आहे काय असे समितीने अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्याधिकारी यांनी सांगितले की, बिंदूनामावली नोंदवहीची मान्यता २००६ मध्ये घेण्यात आली असून आता नोंदवहीच्या संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

इतर मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व शिष्यवृत्ती मिळत नसल्याने इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे यामध्ये फार मोठे नुकसान होऊन अनेक विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागल्यात असल्याने याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व सदर बाब निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागीय सचिवांनकडून उत्तर मिळाले नाही.

इतर मागास प्रवर्गातील शिक्षकांची जी पदे आहेत ती कोणत्या वर्षापासूनची आहेत अशी समितीने विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सन २०१३-२०१४ मध्ये मराठी माध्यमाची संच मान्यता २७ असून २६ सहायक शिक्षक आणि दोन प्रधान उप शिक्षक अशी एकूण २८ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. एक शिक्षक अतिरिक्त आहे. उर्दू माध्यमाची संच मान्यता २१ असून २३ शिक्षक कार्यरत आहेत. संचमान्यतेनुसार इतर मागास प्रवर्गातील ५ पदाचे आरक्षण असून त्यापैकी २ पदे भरली असून ३ पदे रिक्त आहेत. मागील वर्षी संच मान्यता प्राप्त झाली होती परंतु माहे नोव्हेंबर २०१४ पासून संच मान्यता प्राप्त झाली नाही. संच मान्यता मिळण्यासाठी उप संचालक, शिक्षण विभाग यांच्याकडे मागणी केली आहे. परंतु संचमान्यतेच्या संदर्भात काही व्यक्ती कोर्टात गेल्यामुळे सदर प्रकरणी स्थगिती मिळाली आहे. ही पदे सन २०१३-२०१४ च्या संच मान्यतेची आहेत व २५ पदांपैकी १० शिक्षण सेवक इतर मागास प्रवर्गातील आहेत. सन २०१४-१५ मध्ये २ पदे भरली व ३ पदे रिक्त आहेत. तसेच सन २०१५-१६ मध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाल्यामुळे ३ पदे भरली नाहीत. याप्रकरणी समितीने निदर्शनास आणले की, सन २०१४-१५ मध्ये संच मान्यता मिळाली. परंतु सन २०१५-१६ मध्ये संच मान्यता मिळाली नाही. खुल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना आरक्षण असलेल्या पदांमध्ये दर्शविण्यात आले असावे. ही बाब तपासून इतर मागास प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये याकरिता या संदर्भात योग्य ती कार्यवाही करून एक महिन्याच्या कालावधीत अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले.

गलिच्छ वस्ती निर्मुलनासाठी केंद्र शासनाकडून नगरपालिकेला अनुदान प्राप्त झाले आहे काय, असल्यास सन २०१२ ते मे २०१५ या कालावधीत वर्षनिहाय किती रक्कम प्राप्त झाली आहे व त्याचा विनियोग कोणत्या बाबीवर करण्यात आला आहे असे समितीने विचारले असता, मुख्याधिकारी यांनी स्पष्ट केले की, गलिच्छ वस्ती निर्मुलनासाठी केंद्र शासनाच्या आयएचएसडीपी टप्पा क्रमांक १ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या मंजुरीनुसार ८९२ घरकुलांचे उद्दिष्ट होते, त्यापैकी ७६२ घरकुलांची कामे पूर्ण झाली असून १३० घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी २४० घरकुले इतर मागास प्रवर्गातील लोकांकरिता आहेत. तसेच टप्पा क्रमांक २ मध्ये दिनांक ३० मे २०११ रोजीच्या मंजुरीनुसार १३९५ घरकुलांचे उद्दिष्ट होते, त्यापैकी ७५९ घरकुले इतर मागास प्रवर्गातील लोकांकरिता आहेत. माहे डिसेंबर, २०१५ मध्ये दुसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण होणार आहे. त्या वस्तीमध्ये इतर मागास प्रवर्गातील लोकांची संख्या मोठी आहे.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी नगरविकास विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, बुलढाणा नगरपरिषदेने सन २००६ नंतर बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी का केली नाही. त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, सन २००९ आणि सन २०१२ मध्ये बिंदू नामावलीची तपासणी करणे आवश्यक होते. सहायक संचालकांनी विभागास सन २०१० मध्ये पत्र दिले. त्याप्रमाणे सन २०११ मध्ये प्रस्ताव दाखल करण्यात आला. नगरपालिकेतील दोन शिक्षकांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे व सदरहू प्रकरण न्यायालयात गेल्यामुळे बिंदूनामावली तपासणीस विलंब झालेला आहे. त्यानंतर दिनांक ३० जून, २०१५ रोजी नोंदवही सादर केली आहे.

सन २०१४-२०१५ मध्ये संच मान्यता मिळाली. परंतु, सन २०१५-२०१६ मध्ये संच मान्यता मिळाली नसल्याने खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना आरक्षण मिळाले असल्यास इतर मागासवर्ग प्रवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून कोणत्या उपाययोजना योजल्या आहेत असे समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, सन २०१३-२०१४ मध्ये संच मान्यता मिळाली. सन २०१४-२०१५ ची संच मान्यतेची माहिती ऑनलाईन भरलेली आहे. परंतु सदरहू संच मान्यता अद्यापपर्यंत मिळालेली नाही. सन २०१५-२०१६ ची संच मान्यता शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे असून दिनांक १५ सप्टेंबर २०१५ रोजीची पटसंख्या व कार्यरत शिक्षकांची संख्या याबाबत माहिती एकत्रित करण्याचे काम चालू असून या वर्षाची संच मान्यतेची कार्यवाही सुरू होणे अद्याप बाकी आहे. साधारणतः एक महिन्यात कार्यवाही होणे अपेक्षित आहे. याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर समितीला माहिती सादर करण्यात येईल.

इतर मागासवर्गाच्या कल्याणाकरिता नगरपरिषदेने अर्थसंकल्पातून एखादी विशेष योजना राबवून सदर योजनेअंतर्गत वसतिगृह बांधणे, प्रशिक्षण केंद्र उभारणे इत्यादीबाबत देण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने सन २०१४-२०१५ मध्ये निवड झालेल्या २८ लाभार्थींपैकी किती लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सन २०१५-२०१६ मध्ये किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. सदर लाभार्थ्यांना केव्हापर्यंत प्रशिक्षण

देण्यात येणार आहे अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २०१४-२०१५ मध्ये २८ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. वैयक्तिक कर्ज प्रकरणांचे जी प्रकरणे आहेत त्यात मागील आर्थिक वर्षांमध्ये ७ लाभार्थ्यांना किराणा दुकान, इलेक्ट्रिशियन, दुग्ध व्यवसाय करण्यासाठी प्रशिक्षण दिलेले आहे. यामध्ये किमान ५० व्यक्ती इतर मागास प्रवर्गातील आहेत.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) समितीने शेगाव, जळगाव जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषदेस दिनांक २९ जून २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी सदर नगरपरिषदांमध्ये बिंदूनामावली नोंदवही (रोस्टर) मध्ये अनेक त्रुटी आढळून आलेल्या असून त्या त्रुटींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच बिंदूनामावली नोंदवहीची (रोस्टर) दर तीन वर्षांनी तपासणी होणे आवश्यक असतांना त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही. सदरहू प्रकरणी उक्त चारही नगरपरिषदेने बिंदूनामावली (रोस्टर) मधील त्रुटींचे तात्काळ निराकरण करावे तसेच बिंदूनामावलीची दर ३ वर्षांनी संबधित अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करावी. सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

(२) जळगाव जामोद नगरपरिषदेमध्ये " प्रशासन अधिकारी " हे पद रिक्त असल्याचे समितीला दौऱ्याच्या वेळी निदर्शनास आले. त्यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रशासन अधिकारी पदावर एका अधिकाऱ्यांची नियुक्तीचे आदेश काढण्यात आले होते. तथापि, सदरहू अधिकारी तेथे रूजू झालेले नाहीत. नगरपरिषदेचे प्रशासन अधिकारी हे पद महत्त्वाचे असल्याने जे अधिकारी त्याठिकाणी बदली होऊन देखील रुजू झाले नाहीत त्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी तसेच सदरहू पद तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(३) अग्निशमन वर्ग-२ या पदासाठी " अग्निशमन पदवी " ही शैक्षणिक अर्हता आहे. पदवीधारक विद्यार्थी हे ग्रामीण, निमशहरी भागांपेक्षा पुणे, मुंबई यासारख्या शहरी भागात सेवा देण्यात इच्छुक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

सबब, समिती शिफारस करते की, नगरपालिका/महानगरपालिकांच्या अ, ब, क, ड या वर्गवारीनुसार शहरीभागातील नगरपालिका/महानगरपालिका वगळता निमशहरी भागातील नगरपालिका/नगरपंचायतीसाठी या पदाकरिता नियमातील पात्रतेची अट/निकष बदलून त्यासाठी सहा महिन्यांचा पदविका अभ्यासक्रम ग्राहय करण्यात यावा. जेणेकरून अग्निशमन सारख्या अत्यावश्यक सेवेसाठी उमेदवार उपलब्ध होतील, परिणामी आगीपासून होणारी जिवीत व वित्तहानी टाळता येईल. सदरहू प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात द्यावी.

(४) बुलढाणा नगरपरिषदेस समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फीची प्रतिपूर्ती व शिष्यवृत्ती मिळत नसल्याचे समितीला आढळून आले. सदर प्रकरणी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत शासनाने दखल घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी तातडीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी व शिष्यवृत्ती मिळण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जि. बुलढाणा

समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हा बुलढाणा येथे दिनांक ३० जून २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट दऊन महामंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (विभागीय कार्यालय) बुलढाणा येथे वर्ग-१ ते वर्ग-४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या पदासंदर्भात समितीने माहिती विचारली असता विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा यांनी सांगितले की, वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे मध्यवर्ती कार्यालयातून भरली जातात. वर्ग-१ मधील तांत्रिक व अतांत्रिकचे १ पद भरण्यात आले आहे वर्ग २ मधील तांत्रिक उप अभियतांचे पद रिक्त असून तांत्रिक सहायक यंत्र अभियंता/आगार व्यवस्थापकाच्या ७ पदांपैकी ३ पदे रिक्त आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील आरक्षणाची माहिती ही मध्यवर्ती कार्यालयातच उपलब्ध असते. विभागीय कार्यालयाकडून रिक्त पदाची माहिती दर तीन महिन्याला मध्यवर्ती कार्यालयाला पाठविण्यात येते.

वर्ग-३ मधील तांत्रिक घटक संवर्गातील ४०२ पदांपैकी १६८ पदे रिक्त आहेत. वर्ग ३ मधील तांत्रिक घटक संवर्गात ४०२ पदापैकी केवळ २३४ पदेच भरण्यात आली असून १६८ पदे रिक्त आहेत. वर्ग-३ मधील तांत्रिक घटक संवर्गात इतर मागास प्रवर्गातील ९ पदांपैकी ३ पदे रिक्त आहेत. वर्ग-३ व वर्ग-४ मधील इतर मागास प्रवर्गासाठी ४८८ पदे राखीव असून ४९३ पदे भरण्यात आली आहे. वर्ग-४ मधील स्वच्छक या सरळसवेच्या ९ पदांपैकी १ पद रिक्त आहे. सदरहू पद अनुकंपा तत्वाद्वारे भरण्यात येणार आहे. वाहनचालकांची १३८ पदे भरली जाणार असून त्यामध्ये इतर मागास प्रवर्गातील २० पदे आहेत. वाहनचालकांची परीक्षा भोसरी, पुणे येथे घेण्यात येते. असेही विभागीय नियंत्रक यांनी समितीस सांगितले.

इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात येते याबाबतची सविस्तर माहिती विचारली असता, इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता आरक्षित असलेल्या वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदे भरण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाच्या आधारे वर्तमानपत्र तसेच ऑन लाईन पध्दतीने एकाच

वेळी जाहिरात प्रसिध्द करून भरती प्रक्रियेची कार्यवाही केली जाते. भरतीची ऑनलाईन प्रक्रिया करण्याचे काम चाणक्य कंपनीला दिले आहे. ज्या विभागांना चालकांची जास्त आवश्यकता आहे, त्या विभागातील वाहन चालक परिक्षेला प्राधान्य दिले जाते. त्यानुसार पुणे व मुंबई विभागाची परीक्षा झाली असून अमरावती विभागाची परीक्षा घेणे बाकी आहे. याप्रकरणी समितीने निदेश दिले की, वाहन चालकाची परीक्षा घेण्यासंबंधी प्रत्येक विभागीय कार्यालयाने नियोजन करावे व आपल्या विभागाच्या वाहन चालकाची परिक्षा केव्हा होऊ शकेल, याबाबत संबंधितांकडे विचारणा करावी.

सन २०१२-१३ मध्ये इतर मागास प्रवर्गाकरिता वर्ग-३ ची सर्व पदे भरण्यात आली असून सन २०१३-१४ मधील इतर मागास प्रवर्गाकरिता वर्ग-३ च्या ७ पदांपैकी २ पदे रिक्त आहेत. नव्याने नियुक्त झालेल्या वाहनचालकाला ३ वर्षे कनिष्ठ वेतनश्रेणीवर काम करावे लागत असल्यामुळे त्यांना कमी वेतन मिळते. ३ वर्षांनंतर त्यांचे वेतन दीड पटीने वाढते. वाहन चालक पदाकरिता पूर्वी सातवी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता होती. तथापि, आता शैक्षणिक अर्हता दहावी उत्तीर्ण केली असल्याने सदर पदावर काम करण्यास कोणी उत्सुक नसतात, परिणामी वाहनचालकांची पदे रिक्त राहतात. या सर्व गोष्टी विचारात घेऊन शासनाने वाहनचालक पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता कमी करणे गरजेचे आहे. असे विभाग नियंत्रक अधिकारी यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

सन २०१२ ते २०१५ या वर्षांत वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये इतर मागास प्रवर्गातील किती कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता विभाग नियंत्रक अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, लेखी परीक्षेच्या माध्यमातून पदोन्नतीची प्रक्रिया केली जाते. वर्ग-३ ची सन २०१२-१३ मध्ये ३ पदे, सन २०१३-१४ मध्ये १२ पदे आणि सन २०१४-१५ मध्ये ५ पदांकरिता सेवाज्येष्ठतेनुसार परीक्षा घेऊन इतर मागास प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. पदोन्नतीकरिता इतर मागास प्रवर्गाला आरक्षण नाही.

बिंदुनामावली नोंदवही तयार करण्यात आली आहे काय तसेच दर ३ वर्षानंतर बिंदू नामावलीची तपासणी करणे आवश्यक असताना सन १९९२ पासून बिंदू नामावलीची तपासणी का केली नाही अशी समितीने विचारणा केली असता, विभाग नियंत्रक अधिकारी यांनी विषद केले की, माहे एप्रिल २०१५ मध्ये या संदर्भात कार्यवाही सुरू केली आहे. इतर मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या पदांसाठी सन १९८१ पासून बिंदूनामावली ठेवण्यात आली आहे व त्यानंतर सन १९९२ मध्ये मागासवर्ग कक्षाकडून बिंदूनामावली मंजूर करून घेण्यात आली व सन २०१२ ते २०१५ या वर्षांमध्ये बिंदूनामावली नोंदवही तपासणी करण्याकरिता प्रयत्न केला आहे. परंतु मराठा व मुस्लीम आरक्षणाच्या निर्णयामुळे तसेच बिंदूनामावलीमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे त्यासंदर्भातील कामे थांबविण्यात आली.

राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा कार्यालयास सन २००७ ते २०१५ पर्यंतची बिंदूनामावली नोंदवही तयार करता आली नाही. बिंदू नामावली तयार नसताना महामंडळाने चुकीच्या पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती

केली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले त्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात विभाग नियंत्रक अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सन २००७ पासून विभागीय कार्यालयाने बिंदुनामावलीचे काम सुरू केले होते. तसेच मध्यवर्ती कार्यालयाशी पत्रव्यवहार देखील केला होता. परंतु जुने अभिलेख असल्यामुळे ते शक्य झाले नाही. त्याचप्रमाणे बाहेरुन आलेल्या कर्मचाऱ्यांमुळेही बिंदूनामावलीच्या कामामध्ये अडचणी आलेल्या आहेत. तथापि, बिंदूनामावली नोंदवहीचे (रोस्टर) काम तातडीने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासीत करण्यात आले. उपरोक्त प्रकरणी सहायक आयुक्त (मावक), अमरावती यांनी स्पष्ट केले की, बिंदू नामावलीमध्ये संवर्गनिहाय आरक्षण दिले पाहिजे. महामंडळात मनमानी पध्दतीने भरती झालेली नाही. परंतु यासंदर्भात तपासणी करावी लागणार असून काही संवर्गात पदे कमी भरलेली दिसतात. संवर्गनिहाय आरक्षण तपासावे लागणार आहे.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी गृह (परिवहन) विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, इतर मागासवर्ग या प्रवर्गासाठी ४८८ पदे आरक्षित असताना ४९३ पदे म्हणजे ५ पदे अतिरिक्त भरण्याची कारणे काय आहेत. त्यावर विभागीय सचिवांनी विषद केले की, वर्ग १ आणि २ च्या अधिकारी पदाची निवड मध्यवर्ती कार्यालयाकडून होते. वर्ग १ च्या ४ पदांपैकी ३ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाला आरक्षण नाही. वर्ग २ च्या ३१९ पदांपैकी ४२ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाचे आरक्षण ५५ असून त्यापैकी ५ पदे रिक्त आहेत. वर्ग ३ च्या राज्य संवर्गामधील १२८७ पदांपैकी ३२५ पदे रिक्त आहेत. मंजूर पदावर इतर मागास प्रवर्गाचे आरक्षण २४३ असून ६२ पदे रिक्त आहेत. वर्ग-३ च्या घटक संवर्गामधील ८९००७ मंजूर पदापैकी ९०६५ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ च्या १४६०४ मंजूर पदांपैकी ३४६८ पदे रिक्त आहेत. विभागाच्या अंतर्गत असलेली पर्यवेक्षक सवंर्गाची पदे जिल्हा स्तरावर भरण्यात येतात व काही मध्यवर्ती कार्यालयाकडून भरण्यात येतात. वर्ग-१ आणि वर्ग-२ ची परीक्षा घेण्यात आली. त्या अनुषंगाने मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यात येईल. तसेच २३ विभागांची वाहनचालक पदाची भरती प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. बुलढाणा विभागासाठी वाहन चालक परीक्षा दिनांक ८ मार्च २०१६ या तारखेला असून त्याबाबतची कार्यवाही दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीपर्यंत पूर्ण होईल.

राज्य परिवहन सेवेत असलेल्या वाहनचालकांना अल्पवेतन व दहावी उत्तीर्ण ही अट असल्याने वाहनचालक पदाचे उमेदवार मिळत नाही याबाबत मध्यवर्ती कार्यालयाने कोणती कार्यवाही केली आहे असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, या बाबतीत केंद्रीय वाहन कायदयानुसार वाहन परवाना काढण्याकरिता दहावी उतीर्ण उमेदवार लागतात. आता कोणालाही वाहन परवाना काढायचे असेल तर दहावी उत्तीर्ण असणे सक्तीचे केलेले आहे. परिवहन कार्यालयाकडे जे वाहन चालक येतात त्यांच्याकरिता ही अट घातलेली आहे. त्यावर समितीने निदर्शनास आणले की, जे दहावी उत्तीर्ण होतात ते पुढे शिकण्याचा प्रयत्न करतात. ते वाहन चालविण्याचा प्रयत्न करणार नाहीत. तथापि, जे दहावी उत्तीर्ण

होत नाहीत ते वाहनचालकाची नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करतील. विभागाने या अटीबाबत विचारविनिमय केला आहे काय असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, वाहन चालक मिळत नसल्यामुळे शिक्षणाची अट सातवी उत्तीर्णपर्यत करण्यास अनुमती मिळावी असा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. शासन स्तरावर ही बाब विचाराधीन आहे, परंतु अजून त्यावर अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही.

दर तीन वर्षांनी बिंदू नामावलीची आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांच्याकडून तपासणी करणे आवश्यक आहे त्यानुसार सन १९८१ ते १९९२ या कालावधीत बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात आली आहे काय तसेच सन १९९२ ते २००७ पर्यंतचे अभिलेखे विभागीय आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडे केव्हा पाठविण्यात आले, त्यांनी कोणत्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या व सदर त्रुटींची पूर्तता केव्हा करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, सन २००७ पासून बिंदूनामावली तयार करण्याचे काम केले आहे. विभागीय कार्यालयाकडे अभिलेखे उपलब्ध नव्हते. तथापि, बिंदूनामावलीचे काम विभागीय कार्यालयातून दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी सादर केले आहे. त्यामध्ये मागासवर्ग कक्षाने काढलेल्या त्रुटींचे निराकरण करून पुन्हा प्रकरण सादर केले आहे.

मागील १५ वर्षांच्या काळात जी नोकर भरती केली ती वैध आहे की अवैध आहे अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, बिंदूनामावली तयार असते, ज्या बिंदूनामावली परिपूर्ण आहेत त्या तरी मागासवर्ग कक्षाने प्रमाणित करून देणे आवश्यक होते. परंतु एका पदाबाबत त्रुटी काढून मागासवर्ग कक्षाकडून सगळ्या परत केल्यामुळे त्या सगळ्या तशाच राहिलेल्या आहेत.

राज्यातील अनेक प्रशासकीय विभाग हे त्रुटीच्या पूर्ततेसंदर्भात एकमेकांशी पत्रव्यवहार करीत असतात. परंतु, त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित विभाग स्वतःहून कधी एकमेकांकडे अभिलेखे घेऊन जात नाहीत. पत्रव्यवहारांच्या माध्यमातून त्रुटी दूर करण्यासाठी अनेक महिने वेळ वाया घालवण्यात येतो. या पध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. त्रुटी दूर करण्यासाठी विभागीय कार्यालयाने आपआपसात समन्वय साधणे आवश्यक आहे. विभागीय कार्यालयाने एकमेकांवर जबाबदारी ढकलून चालणार नाही. बिंदूनामावली तयार केल्याशिवाय भरती प्रक्रिया राबविता येणार नाही अशा प्रकारचे नियम करण्याची आवश्यकता आहे. सदरहू प्रकरणी दोषी असणाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात यावी, असे समितीने निर्देश दिले असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, सदरहू सेवा अत्यावश्यक सेवा आहे त्यामुळे असा नियम करू शकत नाही. तथापि, बिंदूनामावली नोंदवही मधील त्रुटींची पूर्तता करून समितीस कळविण्यात येईल. नियमानुसार पद भरले नाही तर कारवाई करण्याची तरतूद ॲक्टमध्ये आहे. त्यावर समितीने निदेश दिले की, मागील १५ वर्षांच्या कालावधीमध्ये इतर मागासवर्ग संवर्गातून भरती केलेल्या पदांची माहिती समितीस सादर करण्यात यावी, त्यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, या संदर्भातील संपूर्ण माहिती समितीस देण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :–

(१) समितीने राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा येथे भेट दिली. त्यावेळी समितीस इतर मागास प्रवर्गाच्या कल्याणकरिता कोणत्याही नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे राज्य परिवहन विभागाने इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या कल्याणाकरिता एखादी नाविन्यपूर्ण योजना तयार करण्यात येऊन ती यशस्वीपणे राबविण्यात यावी जेणेकरून ती योजना यशस्वी झाल्यास राज्यासाठी दिशादर्शक ठरू शकेल अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांत सादर करावी.

(२) समितीने राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा येथील कार्यालयास भेट दिली त्यावेळी निदर्शनास आले की, वाहनचालक पदे भरतांना उमेदवारांना दहावी उत्तीर्ण ही अट असल्याने वाहनचालक पदासाठी उमेदवार उपलब्ध होत नाहीत.

समितीच्या मते, परिवहन सेवेतील चालकांना अल्पवेतन व पात्रतेसाठी दहावीची अट असल्यामुळे वाहनचालक पदाचे उमेदवार मिळत नाहीत. केंद्रीय वाहन कायद्यानुसार वाहन परवाना मिळण्यासाठी दहावी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अट आहे. वस्तुतः दहावी उत्तीर्ण विद्यार्थी पुढील शिक्षण घेतात याऊलट दहावी अनुत्तीर्ण वा त्यापेक्षा कमी शिक्षण घेतलेले विद्यार्थी वाहन चालक होण्यासाठी प्रयत्न करतात.

सबब, समिती शिफारस करते की, उक्त शैक्षणिक पात्रतेचा निकष बदलून सातवी पास अशी पात्रता वाहनचालक पदासाठी करण्याकरिता केंद्रीय वाहन कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करण्यात यावा. जेणेकरून राज्यातील बेरोजगारी बऱ्याच अंशी दूर तर होईलच शिवाय महामंडळास कर्मचारी उपलब्ध होतील व ग्रामीण भागात बस सेवा पुरविता येईल.

(३) समितीने राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा येथील कार्यालयास भेट दिली. त्यावेळी निदर्शनास आले की, आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांच्याकडून दर ३ वर्षांनी बिंदूनामावलीची तपासणी करणे आवश्यक असतानाही सन १९९२ पासून बिंदू नामावलीची तपासणी करण्यात आली नाही. तथापि, बिंदू नामावली अद्ययावत नसतानाही नोकर भरती करण्यात आली.

बिंदू नामावलीची तपासणी केल्यावर ज्या त्रुटी काढण्यात येतात त्या त्रुटींची पूर्तता त्वरित करण्यात येत नाहीत. याप्रकरणी समितीच्या मते, त्रुटी दूर करण्यासाठी विभागीय कार्यालयाने एकमेकांशी समन्वय साधणे आवश्यक आहे व सदर प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सद्धा कारवाई होणे आवश्यक आहे.

सबब, समिती शिफारस करते की, सन १९९२ ते २००७ या कालावधीतील अभिलेखे आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडे पाठविण्यात यावेत. सन २००७ पासूनची बिंदू नामावली नोंदवही तयार करून

तिची तात्काळ मागासवर्ग कक्षाकडून तपासणी करण्यात येऊन त्यांनी काढलेल्या त्रुटींचे निराकरण त्वरित करण्यात यावे व बिंदू नामावली अद्ययावत करण्यात यावी, तसेच उक्त कालावधीमध्ये शासन निर्णयानुसार वेळोवेळी बिंदू नामावली अद्ययावत करून न घेणाऱ्या संबधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर उपरोक्त प्रकरणी कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.

जिल्हा परिषद, बुलढाणा

समितीने जिल्हा परिषद, बुलढाणा येथे दिनांक ३० जून, २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन जिल्हा परिषदतर्फे राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. जिल्हा परिषदेमध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादींबाबत तसेच जिल्हा परिषदेच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

जिल्हा परिषदेमध्ये गट- क व गट-ड मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या पदासंदर्भात माहिती विचारली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गट क आणि ड संवर्गाची पदे दर वर्षी नोव्हेंबर महिन्यात सरळसेवेने भरली जातात. परंतु भरती प्रक्रियेमध्ये समस्या निर्माण झाल्यामुळे ही पदे रिक्त राहिली आहेत. शिक्षण विभागामध्ये सरळसेवेची ४० व पदोन्नतीने भरावयाची ३० पदे आहेत. शिक्षण विभागाची सर्व पदे शासनस्तरावर भरली जातात.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील केंद्र प्रमुखांची १० पदे तसेच परिचरची इतर मागास प्रवर्गाची ५० पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, केंद्र प्रमुख हे पद शासन स्तरावरून स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्यात येते. परिचर प्रवर्गामध्ये आरक्षणानुसार इतर मागास प्रवर्गाची संख्या १३७ येते परंतु प्रत्यक्षात १८७ पदे भरण्यात आल्याने ५० पदे जास्तीची झालेली आहेत.

समितीने अशीही विचारणा केली की, ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांची रिक्त पदे केव्हा भरली जाणार आहेत. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत दिनांक ३० मे, २०१५ रोजी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली असून सदरहू परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून रिक्त पदे भरली जातील.

ग्रामविकास अधिकाऱ्यांची ९४ पदे मंजूर असून मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणानुसार १७ पदांपैकी ४ पदेच का भरण्यात आली आहेत असे समितीने विचारले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, ग्रामविकास अधिकाऱ्याची पदे १०० टक्के पदोन्नतीने भरली जातात. पदोन्नतीमध्ये इतर मागास प्रवर्गाला आरक्षण नाही. ग्रामविकास अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. विस्तार अधिकाऱ्यांची ५० टक्के पदे सरळसेवा व ५० टक्के पदे पदोन्नतीने भरली जातात.

जिल्हा परिषदेत आरोग्य सेविकांची इतर मागास प्रवर्गातील ८ पदे रिक्त आहेत. या संबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेत आरोग्य सेविका पदासाठी सरळसेवा भरती झाली. त्यानंतर अनेक कर्मचारी सेवानिवृत्ती झालेले आहेत. यामुळे सदर पदे रिक्त झाली असून त्यातील उमेदवार इतर मागास प्रवर्गातील आहेत. आरोग्य सेविकांच्या पदासंबंधी बंधपत्र घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित ५ रिक्त पदांच्या संदर्भात पुढील वर्षी सरळसेवा भरती होणार आहे. त्यातून ती पदे मिळू शकतील.

इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या पदांसाठी बिंदू नामवलीची नोंदवही ठेवली आहे काय तसेच सर्व कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झाली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, इतर मागासवर्ग जातीच्या उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या पदांसाठी बिंदू नामावली नोंदवही ठेवली आहे. शिक्षण विभागाची अंतर्गत शिक्षण संवर्ग बिंदू नामावली नोंदवही प्रवर्गनिहाय तयार केली आहे. परंतु संच मान्यतेअभावी सदर पदांची बिंदू नामावली मागासवर्ग कक्ष, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. मंजूर पदांची संख्या निश्चित झाली नसल्यामुळे ऑनलाईन प्रक्रिया झाली नाही. ऑनलाईन संच मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. जात पडताळणीच्या संदर्भात दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते. मागास प्रवर्गातील अधिकारी /कर्मचाऱ्यांनी ६ महिन्यांच्या कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. या संदर्भात एका कर्मचाऱ्याने अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत त्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नव्हते. त्यामुळे त्याची सेवा समाप्त केली. याप्रकरणी सदर कर्मचारी न्यायालयात गेला होता. त्यावर न्यायालयाने असा निर्णय दिला की, संबंधित कर्मचाऱ्याला खुल्या प्रवर्गात नेमणूक द्यावी. तसेच त्याला अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ घेता येणार नाही, असे त्यांच्याकडून लेखी घेण्यात यावे.

जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय व अनुदानित वसतिगृहांमध्ये इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना कोणते निकष लावले जातात याबाबत समितीने माहिती विचारली असता, जिल्हा परिषदेच्या संबधित अधिकाऱ्यांनी विदित केले की, दिनांक १६ मार्च, १९९८ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जातीकरिता ८० टक्के, अनुसूचित जमातीकरिता १० टक्के, विमुक्त जाती भटक्या जमातीकरिता ५ टक्के, विशेष मागास प्रवर्गाकरिता २ टक्के, अंध व अपंग विद्यार्थ्यांकरिता ३ टक्के अशा प्रकारे १०० टक्के पूर्ण होतात तसेच त्या खाली इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता टक्केवारी नमूद केलेली नाही. तसेच सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, बुलढाणा यांनी याबाबत स्पष्ट केले की, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गांना प्रवेश देताना २० टक्क्यांमध्ये इतर मागासवर्ग प्रवर्गांचा समावेश केला आहे. यासंदर्भात समितीने सूचित केले की, इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याची सोय असली पाहिजे.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील सर्व विभागांमधील वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे भरण्यात आली आहे काय असे समितीने विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, दर वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याची कार्यवाही होत असते. यातील २७ पदे शासन स्तरावर भरली जाणार असून उर्वरित पदे सन २०१५ च्या नोव्हेंबर महिन्यात भरली जाणार आहेत. वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये पदोन्नतीचे १२३८ कर्मचारी असून इतर मागास प्रवर्गाची संख्या २०९ आहे. त्यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, बुलढाणा जिल्ह्यातील घाटाच्या खालील ६ तालुक्यांमध्ये पदे भरली जात नाहीत, केवळ वरच्या ७ तालुक्यांमध्येच पदांची भरती केली जाते. सदर ६ तालुक्यांवर सातत्याने अन्याय होत आहे. तरी खालच्या ६ तालुक्यांमध्ये भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी.

शिक्षण संस्था चालकांनी बिंदू नामावली पूर्ण केली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, बुलढाणा जिल्ह्यात ३३० अनुदानित शाळा असून सन २०१२ च्या शासन निर्णयानुसार शिक्षक भरती प्रक्रियेवर बंदी आली आहे. प्रत्येक ३ वर्षांमध्ये पदसंख्या कमी किंवा जास्त होत असते. बिंदू नामावली प्रमाणित करून मागासवर्ग कक्षाकडे पाठवले जात असते. परंतु अगोदर जे अतिरिक्त शिक्षक होते त्यांचे प्रथम समायोजन करण्यास सांगण्यात आले आहे. परंतु यावर आता स्थगिती आलेली आहे.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी ग्रामविकास विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरताना इतर मागासवर्गातील १३ पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही केव्हा करण्यात आली. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा निवड समितीमार्फत माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये चार संवर्गात भरती केलेली आहे.

ग्रामसेवक या संवर्गातून ग्राम विकास अधिकारी या संवर्गात स्पर्धा परीक्षेद्वारे नेमणुकीकरिता विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत दिनांक ३० मे, २०१५ रोजी ६ रिक्त पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली त्यापैकी २ रिक्त पदे इतर मागासवर्ग कर्मचाऱ्यांसाठी राखीव होती व त्यामधील १ पद रिक्त आहे. सदरचे रिक्त पद भरण्यात आले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २०१६ रोजी स्पर्धा परीक्षा आयोजित केली होती. या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांमधून या संवर्गातील रिक्त पद भरण्यात येईल.

सरळसेवा पद भरती अंतर्गत माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये आरोग्य सेविका या संवर्गातील इतर मागास प्रवर्गातील एकूण ५ रिक्त पदांसाठी जाहिरात देण्यात येऊन दिनांक २५ नोव्हेंबर २०१५ रोजी लेखी परीक्षेतील गुणवत्ताप्राप्त उमेदवारांच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम निवड यादीस मा.उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की,

जिल्हा निवड समितीमार्फत नेहमीप्रमाणे परीक्षा घेण्यात आली होती. परंतु, पूर्वीपासून कंत्राटी पद्धतीवर असलेले ए.एन.एम.यांचे म्हणणे असे होते की, त्यांना कायम केल्याशिवाय विभागाने नवीन नियुक्ती करू नये. याबाबत त्यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी याचिका दाखल केली होती आणि परीक्षा प्रक्रियेला स्थगिती द्यावी, अशी विनंती न्यायालयाला केली होती. परंतु, परीक्षेला स्थगिती देण्यात येणार नाही, सर्व प्रक्रिया करून घ्यावी आणि या याचिकेच्या निकालानुसार पुढील नियुक्ती करावी, असे निदेश न्यायालयाने दिले. त्यानुसार परीक्षा घेतली आणि निवड यादीही तयार केली आहे. न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार नियुक्ती देण्यात येईल.

निवड यादी जाहीर करणे हा प्रक्रियेचाच एक भाग आहे. प्रक्रिया सूरी करण्यापासून ते निवड यादी जाहीर करून प्रत्यक्ष नियुक्ती देण्यापर्यंतच्या कार्यवाहीसाठी नियमानुसार काही कालमर्यादा निश्चित केलेली आहे. प्रक्रिया सुरू केल्यानंतर जर या कालावधीत नियुक्ती दिली गेली नाही तर संपूर्ण प्रक्रियाच रद्दबातल करावी लागते. जिल्हा परिषदेने सर्व प्रक्रिया केली असून फक्त नियुक्ती दिलेली नाही. कालमर्यादा संपली तर पुढील प्रक्रिया करण्यासाठी अडचण निर्माण होऊ शकते. पुन्हा न्यायालयामध्ये तो मुद्दा उपस्थित केला जाऊ शकतो. न्यायालयाने या प्रक्रियेला स्थगिती दिलेली आहे, असे कुठेही दिसत नाही प्रक्रिया पूर्ण करावी आणि न्यायालयीन आदेशानंतर यादी जाहीर करावी, असे आपल्या निर्णयात न्यायालयाने म्हटलेले आहे काय, न्यायालयाने प्रक्रिया पूर्ण करावी असा निर्णय दिला आहे. याचा अर्थ, निवड यादी जाहीर करून नियुक्ती द्यावी असाही होऊ शकतो. हा न्यायालयाच्या निर्णयाचा अन्वयार्थाचा भाग आहे असे समितीने निदर्शनास आणून विचारणा केली असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील प्रक्रिया करावी, असे न्यायालयाचे निदेश आहेत. न्यायालयाचा निर्णय प्रतिकुल लागला तर नियुक्ती रद्द करण्यात येईल, असे बंधपत्र उमेदवारांकडून लिहून घेऊन काही जिल्ह्यांमध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे. "Court will give further decision in this matter", असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून बंधपत्र लिहून घेऊन नियुक्ती दिली आणि न्यायालयाचा निर्णय वेगळा लागल्यास त्यांची नियुक्ती रद्द करावी लागेल व याबाबत सदर उमेदवार पुन्हा न्यायालयात जातील. पुढील कायदेशीर गुंतागुंत निर्माण होऊ नये म्हणूनच निवड यादी जाहीर केलेली नाही. अन्य जिल्ह्यांमध्ये उमेदवारांकडून बंधपत्र लिहून घेऊन नियुक्ती देण्यात आलेली आहे. न्यायालयाने असेही म्हटले आहे की, But we will give further decision in this matter". न्यायालयाने हे प्रकरण पूर्णपणे बंदही केलेले नाही. However, within 15 days we will give orders. कारण आमची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

जिल्हा परिषद कार्यालयाने निवड यादीतील उमेदवारांना नियुक्ती पत्र द्यावे असे समितीने सूचित केले असता, विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, समितीने दिलेल्या सूचनेनुसार सशर्त नियुक्ती देण्यात येईल. अन्य जिल्ह्यांमध्ये बंधपत्र घेऊन नियुक्ती पत्र दिलेली आहे. सदरहू बैठकीत कंत्राटी ए.एन.एम.यांनी

आम्ही १५ वर्षांपासून कंत्राटी पद्धतीने काम करीत असताना नवीन उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्ती कशी देत आहात, असा प्रश्न उपस्थित केला होता. आरोग्य विभाग या प्रकरणी इतर संबधितांचे सर्वांचे अभिप्राय या संदर्भात घ्यावे लागतील व ते घेण्यात येतील असे समितीस आश्वासन देण्यात आले. त्याबाबत समितीने अशी सूचना केली की, न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने मागासवर्गीयांच्या बाजूने जो अन्वयार्थ असेल त्याचे आपण पालन करावे.

शिक्षण विभाग (प्राथमिक) मधील केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ व ३ वगळता इतर संवर्गांसाठी मागास कक्ष, अमरावती यांची बिंदू नामावलीस मान्यता का घेण्यात आली नाही असे समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, उर्वरित संवर्गाची यादी तयार करण्यात येत असून ती अंतिम टप्प्यावर आहे. त्यामधील ७ संवर्गाचे बिंदू नामावलीचे काम राहिलेले आहे. तसेच त्यामधील इतर ४ संवर्गांचे काम पूर्ण झाले असून त्यांची नोंदवहीमध्ये नोंद घेऊन मान्यता घ्यावयाची आहे. ते काम माहे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल. प्राथमिक व माध्यमिक मराठी शिक्षक व सहायक अध्यापकांची ५००० शिक्षकांची यादी दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजीपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

उपरोक्त प्रकरण किती वर्षांपासून प्रलंबित आहे, ज्या अधिकाऱ्यांनी एवढी वर्षे मान्यता घेतलेली नाही त्यांच्यावर अद्यापपर्यंत कारवाई का करण्यात आली नाही, अशा प्रकारे आणखी किती जिल्हा परिषदा आहेत ज्यांनी हे केलेले नाही त्यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे जेणेकरून पुढे कोणी असा हलगर्जीपणा करणार नाही. ही बाब गंभीर असल्याचे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, यापूर्वी असे प्रकरण झालेलेच नव्हते. हा मोठा संवर्ग असून त्यास मान्यता घेतलेलीच नव्हती. मागील एक वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत असून दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजीपर्यंत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे जवळ जवळ ६० संवर्ग आहेत. आता ही प्रक्रिया सूरू केलेली आहे. ३ लाख २५ हजार कर्मचारी आहेत. त्यांच्यामध्ये छोटे छोटे संवर्ग आहेत. त्यांनी तयार केलेल्या बिंदू नामावलीमध्ये काही चुका होत्या. शिक्षण विभागाचा संवर्ग मोठा असल्यामुळे अनेक अडचणी येतात. तथापि, याबाबतची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

इतर मागास प्रवर्गातील ९७ कर्मचाऱ्यांच्या जात वैधतेबाबतचे प्रस्ताव विभागीय जात पडताळणी प्रमाणपत्र समितीकडे केव्हा सादर करण्यात आले आहेत असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वांची जात प्रमाणपत्रे आहेत. उपरोक्त समितीकडे ३ वर्षांपूर्वी प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु, त्यांच्याकडून अद्याप प्रतिसाद मिळाला नाही. ही प्रकरणे जुनी आहेत. सहा महिन्यांच्या आत त्यांनी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्यावर समितीने निर्देश दिले की, शासकीय कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे एवढी वर्षे प्रलंबित राहिल्यानंतर जर काही अनियमितता झाली तर त्यासंदर्भात कोणत्या प्रकारची कार्यवाही केली जाईल याबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

जिल्हा परिषद, बुलढाणा अंतर्गत शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळेमध्ये शिक्षकांची किती पदे अतिरिक्त आहेत, सदर पदे अतिरिक्त राहण्याची कारणे काय आहेत. असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये सुद्धा समायोजन करताच आले नाही. कारण जेव्हा त्यांचे मुख्याध्यापक संवर्ग अतिरिक्त होते, त्याचे समायोजन झाले. परंतु जेव्हा सहायक अध्यापक या संवर्गाची समायोजन करण्याची प्रक्रिया चालू होती तेव्हा डी.एड् व बी.एड् पात्रता व कामाचा अनुभव या संदर्भात त्यांची यादी तयार करण्यात आली होती. बी.एड् झालेल्या उमेदवारांनी सन २०१४ मध्ये न्यायालयात रिट-पिटिशन दाखल केले की, बी.एड्ला वगळून डी.एड्ला कामाचा अनुभव जास्त होता म्हणून वर घेतले गेले आहे. त्यामुळे समायोजन करता आले नाही. सदरहू रिट-पिटिशनचा निर्णय अजून लागलेला नाही.

अभिप्राय व शिफारशी

दिनांक २९ जून २०१५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा परिषद कार्यालयाच्या बिंदूनामावलीस मागासवर्ग कक्ष, अमरावती यांची अद्यापपर्यंत मान्यता मिळालेली नाही. बिंदूनामावलीस मान्यता न मिळाल्यामुळे सेवा भरती प्रक्रियेस विलंब झाला आहे व त्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची भरतीसाठीची यादी प्रलंबित राहिली आहे. अशाप्रकारे इतरही जिल्हा परिषदांमध्ये बिंदूनामावलीस मान्यता देण्यात आलेली नाही. त्यामुळे संबधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांत कळविण्यात यावी.

समितीच्या निदर्शनास आले की, सरळसेवा भरती अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये आरोग्यसेविका या संवर्गातील इतर मागास प्रवर्गासाठीच्या व रिक्त पदाकरिता जाहिरात दिली असून दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी लेखी परिक्षेतील गुणवत्ता प्राप्त विदयार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आलेली आहे. तथापि, कंत्राटी पद्धतीवर असणाऱ्या ए.एन.एम यांना कायम नियुक्ती दिल्याशिवाय नवीन नियुक्ती करण्यात येवू नये या कारणास्तव न्यायालयात गेल्यामुळे न्यायालयाने " सर्व प्रक्रिया करावी आणि या याचिकेच्या निकालानुसार पुढील नियुक्ती करावी " असे आदेश पारित केलेले आहेत.

समितीच्या मते, निवड प्रक्रिया सुरू करण्यापासून ते निवड यादी जाहीर करणे व प्रत्यक्ष नियुक्ती देणे हा या प्रक्रियेचाच एक भाग आहे. जिल्हा परिषदेने फक्त नियुक्ती दिलेली नसून इतर सर्व सोपस्कार पूर्ण केलेले आहेत. प्रक्रिया सुरू केल्यानंतर विहित कालमर्यादेत नियुक्ती न दिल्यास संपूर्ण प्रक्रियाच रद्दबादल करावी लागेल.

सबब, समिती शिफारस करते की, अन्य जिल्ह्यांमध्ये ज्याप्रमाणे " न्यायालयाचा निर्णय प्रतिकूल लागला तर नियुक्ती रद्द करण्यात येईल " असे बंधपत्र संबंधित उमेदवारांकडून लिहून घेवून त्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी कार्यवाही करावी व संबंधित उमेदवारांना तात्काळ नियुक्त्या देण्यात याव्यात.

उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत देण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाज कल्याण विभाग, बुलढाणा

समितीने प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाज कल्याण विभाग, बुलढाणा कार्यालयास दिनांक ३० जून २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देवून त्यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

शासकीय वसतिगृहांमध्ये इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता किती आरक्षण ठेवले जाते अशी समितीने विचारणा केली असता प्रादेशिक उपायुक्त यांनी सांगितले की, शासकीय वसतिगृहामध्ये यापूर्वी ५ टक्के आरक्षण होते. सन २०१६ पासून १० टक्के आरक्षण आहे.

विभागीय स्तरावर समाजकल्याण विभागामार्फत इतर मागास प्रवर्गाच्या कल्याणाकरिता योजना राबविल्या जातात काय व इतर मागास प्रवर्गाच्या शिष्यवृत्ती संदर्भात तसेच महाराष्ट्रात इतर मागास प्रवर्गाकरिता शिष्यवृत्ती केव्हा पासून लागू झाली याबाबत समितीने विचारणा केली असता, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, जिल्हा बुलढाणा यांनी स्पष्ट केले की, केंद्र शासनाच्या भारत सरकार शिष्यवृत्ती नुसार दिनांक १ नोव्हेंबर २००३ पासून महाराष्ट्रात शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली. दिनांक १३ मार्च २०१२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६ मध्ये इतर मागास प्रवर्गाच्या शिष्यवृत्तीसंबंधी स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

दिनांक २९ मे २००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रात इतर मागास प्रवर्गाकरिता शिष्यवृत्ती योजना लागू झाली. परंतु या बाबतीत समाज कल्याण विभाग अधिकाऱ्यांनी शासन निर्णयानुसार कार्यवाही न केल्यामुळे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना " शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना " व इतर शैक्षणिक सवलतीपासून वंचित रहावे लागल्यामुळे त्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर समितीने सूचित केले की, दि. १३ मार्च २०१२ रोजीचा शासन निर्णय हा केवळ विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (डी.एड. व बी.एड.अभ्यासक्रम वगळून) शिष्यवृत्ती,परीक्षा फी/शिक्षण फी याच्या प्रतिपूर्तीबाबत आहे. दिनांक १३ मार्च २०१२ च्या शासन निर्णयात शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती संबंधी सुधारणा नमूद केलेल्या आहेत, त्यासंदर्भात सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांनी प्रतिपादन केले की, दिनांक १३ मार्च २०१२ च्या परिच्छेद ९ मध्ये राज्यातील शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील अभ्यासक्रमासाठी (डी.एड. व बी.एड. अभ्यासक्रम वगळून) शिष्यवृत्ती, परीक्षा/शिक्षण फी यांच्या प्रतिपूर्तीसंबंधी स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. तसेच इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दि. २९ मे,२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार १०० टक्के सवलत दिली पाहिजे. असे प्रादेशिक उपायुक्त अमरावती यांनी

सांगितले. इतर मागास प्रवर्गाचे जे विद्यार्थी इंजिनिअरिंग, वैद्यकीय किंवा इतर शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या वर्षामध्ये शिक्षण घेत होते त्यांना या योजनेचा लाभ मिळाला परंतु नंतरच्या दुसऱ्या, तिसऱ्या वर्षात या योजनेचा लाभ या विद्यार्थ्यांना न मिळाल्यामुळे लाखो इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागले असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, सहायक आयुक्त यांनी विषद केले की, प्रादेशिक कार्यालयाकडे ५४८ अभ्यासक्रमाचे प्रतिचित्रण झालेले आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी १७०० अभ्यासक्रम आहेत. त्यानंतर समितीने विचारले की, अभ्यासक्रम वगळण्याचे काम नेमके कोण करतो त्याबाबत प्रादेशिक उपायुक्त यांनी सांगितले की, प्रतिचित्रण बरोबर झाले तर प्रादेशिक कार्यालयास काम करणे सोपे जाईल. त्यावर समितीने निदर्शनास आणले की, विभागाने काही अभ्यासक्रम पहिल्या वर्षी सुरू केले परंतु तेच अभ्यासक्रम पुढील वर्षापासून रद्द केल्यामुळे लाखो इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. शासनाने सुद्धा यासंदर्भात कोणतेही निदेश दिलेले नाहीत. सन २०१३-१४ मध्ये इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतले होते, त्याकरिता त्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय होती. परंतु सन २०१४-१५ मध्ये शिष्यवृत्तीमधून सदर अभ्यासक्रम वगळल्यामुळे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू शकणार नाही. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे, असे समितीने निदर्शनास आणले व यावर आणखी विचारणा केली की, एकूण ५५० अभ्यासक्रम आहेत त्या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया झाली आहे काय त्याबाबत सहाय्यक आयुक्त यांनी स्पष्ट केल की, सदरहू अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यावर समितीने निदेश दिले की, उपरोक्त अभ्यासक्रमासाठी पुढील वर्षी सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

बुलढाणा जिल्ह्यात इतर मागास प्रवर्गात जात पडताळणीकरिता किती प्रकरणे प्रलंबित आहेत अशी समितीने विचारणा केली असता सहाय्यक आयुक्त यांनी सांगितले की, माहे नोव्हेंबर, २०१४ ते माहे जून, २०१५ पर्यंत विद्यार्थ्यांकडून जात पडताळणी प्रमाणपत्राकरिता एकूण ८,२२१ प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी ७,४२५ जात पडताळणी प्रमाणपत्रे दिली असून ७९५ प्रकरणे प्रलंबित आहेत. सेवा प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्राकरिता एकूण ३,२५७ प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी २,७९६ जात पडताळणी प्रमाणपत्रे दिली असून ४६१ प्रकरणे प्रलंबित आहेत. निवडणूक प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्राकरिता एकूण ९० प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी ८० जात पडताळणी प्रमाणपत्रे दिली असून १० प्रकरणे प्रलंबित आहेत. अशाप्रकारे एकूण जात पडताळणी प्रमाणपत्राकरिता एकूण ११,५६८ प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी १०,३०१ जात पडताळणी प्रमाणपत्रे पारित केली असून १,२६६ प्रकरणे प्रलंबित आहेत.

सन २०१२ ते २०१५ या कालावधीत इतर मागास प्रवर्गाकरिता मोटार वाहन प्रशिक्षणाकरिता किती निधी खर्च झाला, प्रशिक्षणाकरिता लाभार्थ्यांची निवड कशी केली जाते अशी समितीने विचारणा केली असता, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी प्रतिपादन केले की, सन २०१२ ते २०१५ या कालावधीत इतर मागास प्रवर्गाकरिता मोटार वाहन प्रशिक्षणाअंतर्गत हलक्या वाहनाचे ६९८९, अवजड वाहनाचे ५७

आणि वाहकाचे १४५ असे एकूण ७,१९१ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणार्थींना हलके मोटार वाहन प्रशिक्षणाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३,५२०/-, जड मोटार वाहन प्रशिक्षणाकरिता प्रति विद्यार्थी रु.४,१००/- वाहक प्रशिक्षणाकरिता प्रति विद्यार्थी रु. १,४६५/- रक्कम अदा केली जाते. दिनांक २३ जुलै, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर प्रशिक्षणाचा लाभ दिला जातो. सदर योजनेतंर्गत लाभ द्यावयाच्या विद्यार्थ्यांची यादी रमेश मोटार ड्रायव्हींग स्कूलकडून प्राप्त करून घेतली जाते. नियमानुसार विभागाकडे अर्ज येणे अपेक्षित असते. त्यावर समितीने सूचना केली की, सदर शासन निर्णयाची प्रत समितीकडे सादर करावी.

सदर योजनेतंर्गत विद्यार्थ्यांना लाभ देण्याकरिता सामाजिक न्याय विभागाकडून विद्यार्थ्यांची निवड करणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू असताना प्रत्यक्ष तपासणी करण्याकरिता तेथे भेट दिल्याची नोंद आहे काय, सदर प्रशिक्षणाकरिता येत असलेल्या प्रस्तावांची सद्यःस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता, सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी स्पष्ट केले की, सहायक आयुक्तांनी (मावक) या संबंधी वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असते. परंतु बुलढाणा जिल्ह्यात अशी तपासणी झाली नाही. याबाबत समाज कल्याण निरीक्षक यांनी स्पष्ट केले की, संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडील दिनांक १७ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रानुसार असे कळविण्यात आले आहे की, विजाभज, इमाव व विमाप्र यांच्याकरिता अनुसूचित जातीच्या धर्तीवर दि. २३ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये राज्यात रमेश मोटार ड्रायव्हींग स्कूल, जळगाव यांच्यामार्फत प्रशिक्षण देण्याची योजना सुरू करण्यात आली. सदर शासन निर्णयाच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशिक्षण देण्याकरिता रमेश मोटार ड्रायव्हींग स्कूल, जळगाव यांच्या समवेत दिनांक १४ ऑगस्ट, २००९ पासून ५ वर्षांचा करारनामा करण्यात आला होता. त्यानुसार दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी करारनाम्याची मुदत संपली. या संदर्भात मुदतवाढ मिळण्यासंबंधी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. परंतु त्या बाबत शासनाकडून कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील युवकांना मोटार वाहन व वाहकाचे प्रशिक्षण देण्याबाबत दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ पर्यंत मुदत होती. सदर मुदत संपण्यापूर्वी निविदा प्रक्रिया करू नये. तसेच दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ पर्यंत प्रशिक्षण सुरू ठेवण्याबाबत संबंधित संस्थेने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करून स्थगिती घेतली होती. यामुळे प्रशिक्षण सुरू होते. नंतर सदर संस्थेने याचिका मागे घेतली. ” यामुळे माहे फेब्रुवारी, २०१५ पासून सदर प्रशिक्षणाचे प्रस्ताव येत नाहीत.

सन २००९ ते २०१५ पर्यंत अमरावती विभागात मोटार वाहन प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांची जिल्हानिहाय यादी समितीकडे सादर करावी असे उपरोक्त प्रकरणी समितीने निदेश दिले. इतर मागास प्रवर्गाच्या कल्याणाकरिता व त्यांच्यावर कोणताही अन्याय होऊ नये, तसेच सध्याच्या कार्यपद्धतीत ज्या त्रुटी राहिल्या आहेत, त्या भविष्यात राहू नयेत असा समितीचा मूळ उद्देश आहे, असे मत व्यक्त केले.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी सामाजिक न्याय विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २९ मे २००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी व परीक्षा शुल्क योजनेंतर्गत किती टक्के शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती देण्यात आली आहे यावर विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, सन २००३ मध्ये केंद्र शासनाची एक योजना होती. स्कॉलरशीपमध्ये निर्वाहभत्ता आणि फ्रीशीप असे दोन भाग आहेत. विभागाकडून निर्वाहभत्ता १०० टक्के आणि काही ठिकाणी फ्रीशीप १०० टक्के दिली जात होती. परंतु, त्यामध्ये संभ्रम होता. विभागाने दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार ५० टक्के प्रतीपूर्ती करण्यास सांगितले होते. तथापि, काही ठिकाणी अधिकाऱ्यांनी ५० टक्के तर काही ठिकाणी १०० टक्के प्रतीपूर्ती केल्यामुळे तक्रारी आलेल्या होत्या. त्यानंतर अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये याकरिता खुलासा करण्यात आला होता. त्यानंतर विभागाने योग्य तो खुलासा सादर केला होता. सदर विषय मंत्रिमंडळापुढे गेला असता ५० टक्केनुसार प्रतीपूर्ती करण्याबाबत पूर्वीप्रमाणेच निश्चित करण्यात आले होते. शैक्षणिक शुल्काची प्रतीपूर्ती ५० टक्केनुसार केली जाते आणि केंद्र शासनाच्या सूचनेनुसार १०० टक्के निर्वाहभत्ता दिला जातो. राज्य शासनाची फ्रीशीपची वेगळी योजना आहे.

भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील अटी व शर्ती अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील असलेल्या अटी व शर्तीप्रमाणेच राहतील असे समितीने निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागीय सचिवांनी सांगितले की, ईबीसी सवलत सन २००६-२००७ मध्ये लागू केलेली आहे. ४ वर्षांमध्ये सदरहू सवलतीच्या माध्यमातून १०० टक्के प्रतीपूर्ती केलेली आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिकदृष्ट्या १७०० अभ्यासक्रम आहेत. इतर मागासवर्गीयांसाठी फक्त ५४३ कोर्सेस असल्यामुळे, त्यामध्ये वाढ करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले वा करण्यात येत आहेत. असे समितीने विचारले असता यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिकदृष्ट्या १७०० अभ्यासक्रम आहेत त्यापैकी इतर मागासवर्गीयांसाठी ५४३ अभ्यासक्रमासाठी ई-स्कॉलरशीप ऑनलाईन प्रणाली मॅपिंग करण्यात आलेली आहे. उर्वरित अभ्यासक्रमासाठी मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सन २०१३-१४ मध्ये शिष्यवृत्ती अनुज्ञेय नसतांना शिष्यवृत्ती देण्याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आज्ञावलीमध्ये तांत्रिक बाब निर्माण झाल्यामुळे संगणकावर अभ्यासक्रम दिसत नव्हते. सन २०११ मध्ये केंद्र शासनाने निर्देश दिले होते त्याप्रमाणे मंत्रीमंडळाची मंजूरी घेण्यात आली नव्हती. जुन्या अभ्यासक्रमांना मंत्रिमंडळाची मंजुरी होती. परंतु, नवीन अभ्यासक्रमांना परवानगी नव्हती. सदरहू प्रकरण मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात आल्यावर मुलांचे नुकसान होऊ म्हणून त्यांना देखील ताबडतोब घेण्यात यावे, असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. अनुसूचित जातीच्या संवर्गातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांना मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्यांनी त्या

मुलांना शिष्यवृत्ती दिलेली आहे. सन २०१० मध्ये अनुसूचित जातीसाठी नवीन अभ्यासक्रम आले. त्यासंदर्भातील बाबींना मंत्रीमंडळाने मंजुरी देखील दिलेली आहे. पुढच्या वर्षीच्या इतर मागासप्रवर्गाच्या अभ्यासक्रमांना मान्यता मिळालेली आहे. सदरहू प्रकरण मंत्रीमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येणार आहे.

अमरावती विभागात जात पडताळणी प्रमाणपत्राची १२६६ प्रकरणे प्रलंबित असून या संबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, उपरोक्त सर्वच प्रकरणे निकालात काढण्यात आली आहेत.

रमेश मोटार ड्रायव्हींग स्कूल, जळगाव एजन्सी यांनी मागील पाच वर्षांत किती युवक, युवतींना प्रशिक्षण दिले आहे, यासाठी त्यांना किती निधी देण्यात आला, त्यापैकी किती खर्च झाला याबाबतची जिल्हानिहाय तपशिलवार माहिती देण्यात यावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांकडून समितीस उपरोक्त प्रश्नाबाबत माहिती मिळाली नाही.

उपरोक्त प्रकरणी समितीने निदर्शनास आणले की, सदर कालावधी सन २०१२ ते २०१५ असा आहे. शासनाने लाखो रक्कम खर्च केलेला आहे. पण तीन वर्षांत प्रशिक्षण देण्यात आले आहे किंवा नाही हे तपासण्यात आलेले नाही. तेव्हा या प्रकरणी विभाग संबधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आहे असे समितीने विचारले असता त्यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात येईल. नियमाप्रमाणे संबंधितांवर १५ दिवसांत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येईल. त्याद्वारे त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल. त्यानंतर संबधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्यात येईल. विभागीय चौकशीसाठी संबंधित अधिकारी जर वर्ग-१ मधील असेल तर ते प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे जाते. यावर समितीने निदेश दिले की, उपरोक्त प्रकरणांची लवकरात लवकर चौकशी करण्यात येऊन त्यासंदर्भातील माहिती समितीला सादर करावी.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) समितीच्या निदर्शनास आले की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिक दृष्टया १७०० अभ्यासक्रम आहेत. परंतू इतर मागास प्रवर्गासाठी फक्त ५४३ अभ्यासक्रम आहेत.

समितीच्या मते, काळाच्या ओघात कला, वाणिज्य व विज्ञान या तसेच अनेक विद्या शाखा उदयास आलेल्या आहेत.

सबब, काळाची गरज ओळखून इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांमधील नाविन्य पूर्ण व उद्योजकता विकासासाठी हातभार लागेल अशा स्वरुपाचे अभ्यासक्रम सुरू करण्यात यावे त्याचप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी असणारे सर्वच्या सर्व म्हणजेच १७०० अभ्यासक्रम इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध करून देण्यात यावेत जेणेकरून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज पूर्ण होईलच शिवाय त्यांना लगेच रोजगार उपलब्ध होईल.

(२) बुलढाणा जिल्ह्यातील युवक व युवतींना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगाव एजन्सी यांच्यामार्फत देण्यात येत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. शासनाने सदर प्रशिक्षणासाठी रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल यांना मागील ५ वर्षासाठी किती निधी दिला व त्यापैकी त्यांनी किती खर्च केला आणि त्यातून किती युवक/युवतींना प्रशिक्षण दिले याबाबतची माहिती समितीस प्राप्त होऊ शकली नाही. या प्रकरणाची समितीने गंभीर दखल घेऊन याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व समितीस उपरोक्त प्रकरणाची माहिती तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

उक्त दोन्ही प्रकरणी समितीने केलेल्या शिफारशीवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात अवगत करण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक ३० जून २०१५ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या काही विविध कल्याणकारी योजनांची पाहणी केली. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन आढावा घेतला.

जिल्ह्यातील लोकसंख्या २५,८६,२५८ असून यामध्ये इतर मागास प्रवर्गाची लोकसंख्या किती आहे असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ‘ सन २०११ च्या जनगणनेनुसार इतर मागास प्रवर्गाची स्वतंत्र गणना करण्यात आलेली नाही. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बुलडाणा यांचे अहवालानुसार जिल्ह्यात सामाजिक, आर्थिक व जात निहाय सर्व्हेक्षण २०११ अंतर्गत प्रारुप याद्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या असून सदर याद्यांसंदर्भात जनतेकडून २३००० हरकती व सूचना आल्यामुळे या कामाला विलंब झालेला आहे. परंतु आता यासंदर्भात संगणक प्रणालीमध्ये नोंद घेण्याचे काम सुरू असून सहा महिन्यात ही माहिती मिळू शकेल. त्याकरिता संगणक आयोजक पद वाढविण्याची मागणी करण्यात आली होती परंतु ती मान्य झाली नाही,’ असे स्पष्ट केले असता संगणक आयोजक पद (ऑपरेटर) वाढवून काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, असे समितीने निदेश दिले.

जिल्ह्यातील अधिकारी तसेच इतर विविध विभागातील अधिका-यांची एकूण किती पदे मंजूर आहेत. त्यापैकी किती व कोणती पदे इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत, राखीव पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे भरण्यात आलेली आहेत व अद्याप किती पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्यासाठी आतापर्यंत काय प्रयत्न करण्यात आलेले आहेत तसेच सन २००८ पर्यंत वर्ग ‘अ‘ ची ३९५ पदे व वर्ग ‘ब‘ची १०७१ पदे मंजूर होती त्यापैकी किती पदे भरण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, सन २००८ ते जून २०१४ पर्यंत भरती बंद होती. माहे जुलै, २०१४ पासून भरती प्रक्रिया सुरू झालेली आहे. माहे सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१५ पर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण केली जाईल. संपूर्ण जिल्ह्यातील अधिकारी/कर्मचा-यांची ही आकडेवारी आहे. सर्व अधिकारी/कर्मचा-यांचे वेतन ऑनलाईन होत असल्यामुळे ही सर्व माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासित करण्यात आले.

इतर मागास प्रवर्गाच्या कर्मचा-यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी प्रलंबित आहेत काय तसेच सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी मागासवर्ग कक्ष स्थापन केला आहे काय अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, इतर मागास प्रवर्गाच्या कर्मचा-यांकडून कोणत्याही तक्रारी आलेल्या नाहीत. तसेच कार्यालयातील आस्थापना शाखेतून इतर मागास प्रवर्गातील अधिकारी/ कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी हाताळल्या जातात. जिल्हाधिकारी कार्यालयात यासाठी स्वतंत्ररित्या विशेष मागासवर्ग कक्ष नाही, त्यावर समितीने सूचना केली की, कर्मचा-यांची संख्या ५०० पेक्षा जास्त असेल तेथील कर्मचा-यांकरिता मागासवर्ग कक्ष स्थापन करणे आवश्यक आहे त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी समितीच्या सूचनेचा विचार करण्यात येईल असे आश्वासित केले.

इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी असलेली बिंदू नामावली मागासवर्ग कक्षाकडून कधी तपासून घेण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी विषद केले की, इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी असलेली बिंदू नामावली मागासवर्ग कक्षाकडून दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी तपासून घेण्यात आल्याचे तसेच सहाय्यक आयुक्त (मावक) अमरावती यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१२ रोजी सदर बिंदू नामावली तपासून मंजूर केली आहे.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी महसूल विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००८ ते जून, २०१४ पर्यंत भरती बंद असल्याने जिल्हाधिकारी यांच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या ७४ लिपिक-टंकेलेखक व २६ तलाठी संवर्गाची भरती प्रक्रिया केव्हा करण्यात आली, इतर मागासवर्गासाठी १९ टक्के आरक्षण असताना १९ टक्क्यानुसार १२ जणांना लिपिक-टंकलेखक संवर्गात निवड करण्याची कारणे काय आहेत, तसेच तलाठी संवर्गात इतर मागासवर्गातील उमेदवारांची निवड का करण्यात आली नाही व सन २००८ ते २०१४ पर्यंत भरती प्रक्रिया बंद असल्याने सदर कालावधीत पदोन्नतीने पदे भरण्यात आली आहेत काय, असल्यास कोणती व किती पदे भरण्यात आली यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, सन २०१४ पर्यंत लिपिक-टंकलेखकांच्या रिक्त असलेल्या ७४ जागा व २६ तलाठी संवर्गाची भरती प्रक्रिया करण्यात आली. त्यापैकी समांतर आरक्षणाचे जे शासनाचे धोरण आहे त्याप्रमाणे त्या वर्गाच्या १९ टक्के जागा भरण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत सरळसेवेच्या भरतीच्या जागा शिल्लक नाहीत, त्या जागा नियमितपणे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तलाठी सवंर्गामध्ये १९ टक्के प्रमाणे उमेदवारांची भरती का करण्यात आली नाही तसेच तलाठी संवर्गात २६ पदे असून त्यामध्ये इतर मागास वर्गासाठी १९ टक्के आरक्षण आहे काय असे समितीने विचारले असता यावर विभागीय सचिवांनी विदित केले की, तलाठी संवर्गातील रिक्त पदाबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. परंतु, इतर जिल्ह्यांतून काही तलाठी आलेले आहेत. त्याच्यामध्ये कोटा समावेश केला किंवा कसे याची माहिती समितीस लेखी कळविण्यात येईल.

सन २००८ रोजीच्या उपलब्ध माहितीनुसार वर्ग-अ आणि वर्ग-ब ची पदे भरण्यात आल्याचे नमूद केले आहे. सन २०१५ ची अद्ययावत माहिती उपलब्ध नसल्याची कारणे काय आहेत सन २००८ च्या उपलब्ध माहितीनुसार वर्ग-'अ' च्या ३९५ पदांपैकी ३१८ व वर्ग 'ब' च्या १०७१ पदांपैकी ७९९ पदे भरण्यात आलेल्या पदांपैकी किती पदे इतर मागास वर्गीयांसाठी भरण्यात आली आहेत, तसेच उर्वरित रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे, अशी पदे अद्यापपावेतो भरली नसल्यास त्याबाबतची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वर्ग-अ व वर्ग-ब या पदांची भरती सन २००८ नंतर सन २०१४ -२०१५ मध्ये घेण्यात आली. सुरूवातीला ती ऑनलाईन नव्हती. आता ऑनलाईन संगणक प्रणालीमधील माहिती पडताळणीच्या स्थितीत आहे. त्यामुळे सन २०१५ ची आकडेवारी नाही. जिल्हापातळीवर जो एक टक्का येतो तो एकूण मंजूर पदे आणि भरलेली पदे एवढाच येतो, इतर मागासवर्गींयांसाठी किती पदे आहेत त्याबाबतची माहिती येत नाही.

जिल्हास्तरावर विविध खात्यांची जी रिक्त पदे आहेत त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाच्या रिक्त पदांचे प्रमाण किती आहे तसेच जिल्हास्तरावर विविध कार्यालये आहेत त्यामध्ये वर्गवारीनुसार किती पदे रिक्त आहेत, त्यापैकी इतर मागासवर्गासाठी किती पदे आरक्षित आहेत तसेच वर्ग 'अ' आणि 'ब' ची काही पदे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत नियुक्त केली जातात काय अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हाधिका-यांचा संबंध फक्त जिल्हास्तरीय निवड समितीशी आहे. 'अ' वर्गाच्या भरतीची प्रक्रिया त्यांच्याकडे येत नाहीत. तसेच लिपिक-टंकलेखकाच्या जागा भरण्यासाठी दिनांक १६, मे २०१४ रोजी जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार इतर मागासवर्ग प्रवर्गातील १९ टक्केनुसार पदभरती केलेली आहे. दिनांक ४ जून २०१४ रोजी तलाठी संवर्गाची जाहिरात देण्यात आली होती. जिल्ह्यात तलाठी संवर्गात एकूण ५३९ पदे मंजूर आहेत. परंतु, यापूर्वी इतर मागास प्रवर्गाचा कोटा पूर्ण झालेला असल्यामुळे जाहिरातीमध्ये इतर मागास प्रवर्गाच्या जागा भरण्यात आल्या नाहीत.

त्यावर समितीने असेही निदर्शनास आणले की, समितीच्या माहितीप्रमाणे 'ब' वर्गातील काही पदे भरलेली नाहीत. त्यासंदर्भात विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, शासन स्तरावर हा विषय सामान्य प्रशासन विभागाकडे आहे, जिल्हास्तरावरील प्रत्येक विभागाअंतर्गत झालेल्या भरती प्रक्रिया संदर्भातील माहिती एका महिन्यात उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासित करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्या तक्रारी ऐकून त्या सोडविण्यासाठी मागासवर्ग स्थापन करण्यात आला आहे काय असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, यासंदर्भात शासन निर्णय असून त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, कोणत्याही कार्यालयात ५०० पेक्षा जास्त अधिकारी/कर्मचारी असतील त्याठिकाणी अशाप्रकारचा मागासवर्ग कक्ष स्थापन केलाच पाहिजे. मंत्रालय स्तरावरुन सूचना देण्यात आली आहे की, अशा प्रकारचा मागासवर्ग कक्ष तात्काळ स्थापन करून त्या संदर्भातील अहवाल समितीला आणि शासनाला देखील पाठविण्यात यावा.

एमआयडीसीमध्ये नव्याने उद्योग सुरू करण्याच्या संदर्भात इतर मागासवर्ग प्रवर्गातील १९८ उद्योजकांना नोंदणी देण्यात येऊन ४३ उद्योजकांचे उद्योग सुरू झाले. उर्वरित इतर मागासवर्गातील उद्योजकांनी उद्योग सुरू न करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर उद्योजकांना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कर्ज पुरवठा करण्यात येतो काय, असल्यास किती व कोणत्या दराने देण्यात येतो, त्याचप्रमाणे त्याबाबत जनजागृती करण्यात येते काय असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, एमआयडीसीच्या जागेवरील उद्योगासाठी ऑनलाईन अर्ज करावे लागतात आणि निवड झालेल्या व न झालेल्या उद्योजकांना त्यांचे गुण दोष (मेरीट-डीमेरीट) कळविण्यात येतात. जिल्हा उपकेंद्रामध्ये ज्या उद्योगांची नोंदणी झाली अशा ४३ उद्योगांची माहिती समितीस देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून एकूण १९८ उद्योजकांनी तात्पुरते नोंदणीकरण केले असून तेथे एमआयडीसी प्रस्तावित आहे. कारण तात्पुरते नोंदणीकरण केल्याशिवाय प्लॉट मिळत नाही. आता ती देऊ करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तीन योजना राबविण्यात येतात. ग्रामीण कारागीरांना उद्योग स्थापनेसाठी जिल्हा उद्योग कर्ज योजना आहे त्यामध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळते. दुसरी बीज भांडवल योजना असून त्यामध्ये २५ लाख रुपयांपर्यंत १५ ते २० टक्क्यांनी बीज भांडवल देण्यात येते. तिसरी पीएमईजीपी योजना असून त्यामध्ये ३५ टक्क्यापर्यंत सबसिडी आहे. त्याबाबतचा खर्च बँक सांभाळते.

प्रत्येक वर्षी पीएमईजीपीचे उदिष्ट काय असते अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या वर्षी म्हणजे २०१५-२०१६ साठी उदिष्ट ठरविण्यात आले नव्हते. कारण २०१४-२०१५ मध्ये उदिष्ट पूर्ण झाले होते. केंद्र सरकारकडून आता सबसिडीची रक्कम आलेली आहे. वाटपाची कार्यवाही सुरू आहे. इतर मागासवर्गातील ४३ उद्योग एमआयडीसीमध्ये सुरू आहेत. जिल्हा उद्योग केंद्र नेहमीच अग्रेसर असते. सन २०१४-२०१५ चे राज्यस्तरीय उदिष्ट जास्त झाल्यामुळे सन २०१५-२०१६ ला उदिष्ट देण्यात आले नाही. सध्या जाहिरात देणे सुरू आहे. ऑन लाईन अर्ज करायचा आहे. आपण वर्तमानपत्रात जाहिरात देतो, मेळावे घेण्यात येतात, मेळाव्यात माहिती पत्रक दिली जातात, मेळावे घेतल्यामुळे चालना मिळते. त्याशिवाय तालुका उद्योग निरीक्षक दर आठवड्याला पंचायत समितीस भेट देतात. तसेच लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते.

अभिप्राय व शिफारशी

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस निदर्शनास आले की, जिल्ह्यातील विविध विभागात मोठया प्रमाणात रिक्त पदे आहेत. सदरहू पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केली जाते. जिल्हाधिकारी हे जिल्हास्तरीय निवड समितीचे प्रमुख असतात. सबब, जिल्ह्यातील विविध विभागात रिक्त असलेली पदे सामान्य प्रशासन विभागाच्या सहाय्याने तातडीने भरण्यात यावी व त्यामध्ये इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षण ठेवण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. तरी, याप्रकरणी शासनाने आवश्यक ती कार्यवाही करून समितीला दोन महिन्यांच्या आत माहिती सादर करावी.

परिशिष्ट
(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

पहिली बैठक
दिनांक २९ जून २०१५

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक २९ जून २०१५ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव, जळगांव-जामोद, मलकापूर आणि बुलढाणा नगरपरिषद येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती

समिती प्रमुख

(१) डॉ. संजय कुटे, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(३) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(४) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. श्रीकांत शेटे, अवर सचिव

श्री. घ. ज्ञा. देबडवार, कक्ष अधिकारी

मागासवर्ग कक्ष, अमरावती

श्री. ज. भि. अपाले, सहा. आयुक्त अमरावती

समाजकल्याण विभाग, बुलढाणा

श्री. नितीन ढगे, सहा. आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा

शेगांव नगरपरिषद

(१) श्री. तै. ग. मुलाणी, मुख्याधिकारी

(२) श्री. पी.आर. शिंदे, उप मुख्याधिकारी

(३) श्री. बाबासाहेब वाघमोडे, उप विभागीय अधिकारी, खामगाव

(४) श्री. के. एल. जावळे, प्रशासन अधिकारी

जळगाव-जामोद नगरपरिषद

(१) श्री. शेळके, मुख्याधिकारी

(२) श्री. धनंजय गोगटे, प्रांत अधिकारी

(३) श्री. नितीनकुमार हिंगोले, तहसीलदार, जळगाव जामोद

मलकापूर नगरपरिषद

(१) श्री. कुशल छाजेड, मुख्याधिकारी

(२) श्री. धनंजय गोगटे, प्रांत अधिकारी

(३) श्रीमती वैशाली देवकर, तहसीलदार, नांदुरा

(४) श्री. आर. आर. जोशी, तहसीलदार, मलकापूर

बुलढाणा नगरपरिषद

(१) श्री. संजय ओहोळ, मुख्याधिकारी

(२) श्री. श्रीपाद देशपांडे, उप मुख्याधिकारी

(३) श्री. प्रकाश बोरकर, प्रशासन अधिकारी

(४) श्री. टी. आर. बनसोडे, लेखापाल

सदरहू बैठकीत समितीने शेगांव, जळगांव-जामोद, मलकापूर आणि बुलढाणा या नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

दुसरी बैठक

दिनांक ३० जून २०१५

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक ३० जून २०१५ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बुलढाणा विभाग, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा बुलढाणा प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाज कल्याण विभाग, बुलढाणा येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती

समिती प्रमुख

(१) डॉ. संजय कुटे, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(३) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(४) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

श्री. श्रीकांत शा. शेटे, अवर सचिव

श्री. घ. ज्ञा. देबडवार, कक्ष अधिकारी.

प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती

(१) श्री. ज. भि. अपाले, सहा. आयुक्त (मावक), अमरावती

(२) श्री. एल. आय. वाघमारे, प्रादेशिक उपायुक्त

समाजकल्याण विभाग, बुलडाणा

(१) श्री. नितीन ढगे, सहा.आयुक्त, समाजकल्याण, बुलडाणा

(२) श्री. अे. पी. मोहोड, समाजकल्याण निरीक्षक

राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बुलढाणा विभाग, बुलढाणा

(१) श्री. एन. एन. मैंद, विभाग नियंत्रक, रा. प. बुलढाणा

(२) श्री. एम. बी. पटारे, प्रादेशिक व्यवस्थापक, रा. प. अमरावती

(३) श्री. सुभाष पाटील, वि. क. व अधि. रा. प. बुलढाणा

(४) श्री. पी. एस. जाधव, यंत्र अभियांत्रिकी, रा. प., बुलढाणा

जिल्हा परिषद, जिल्हा बुलढाणा

(१) श्रीमती दिपा मुधोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्र)

(३) श्री. प्र. द. ताठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा बुलढाणा

(१) श्री. शिवानंद टाकसाळे, जिल्हाधिकारी
(२) डॉ. सचिन खल्लाळ, उप विभागीय अधिकारी, सिंदखेड राजा
(३) श्री. बाबासाहेब वाघमोडे, उप विभागीय अधिकारी, खामगांव
(४) डॉ. निलेश अपार, उप विभागीय अधिकारी, मेहकर
(५) डॉ. विवेक घोडके, उप जिल्हाधिकारी, महसूल
(६) श्री. श्रीकांत देशपांडे, निवासी उप जिल्हाधिकारी
(७) श्री. अनिल न. पवार, उप जिल्हाधिकारी, भूसंपादन
(८) श्री. अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.
(९) श्री. रमेश घेवंदे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा

सदरहू बैठकीत समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बुलढाणा विभाग, बुलढाणा जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा बुलढाणा प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाज कल्याण विभाग, बुलढाणा येथील अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

तिसरी बैठक

दिनांक २३ फेब्रुवारी २०१६

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

उपस्थिती

समिती प्रमुख

(१) डॉ. संजय कुटे, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(३) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
(४) श्री. राजेश काशिवार, वि.स.स.
(५) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(६) श्री. नागेश पाटील-अष्टीकर, वि.स.स.
(७) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
(८) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. ज. बा. राणे, अवर सचिव (समिती).

ग्राम विकास विभाग, मंत्रालय

(१) श्री. व्ही. गिरिराज, प्रधान सचिव
(२) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव
(३) श्री. प्रियदर्शन कांबळे, अवर सचिव

सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय

(१) श्री. उज्ज्वल उके, प्रधान सचिव
(२) श्री. उ. शि. लोणारे, सह सचिव

महसूल व वन विभाग, मंत्रालय

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय

श्री. टि. वा. करपते, उप सचिव

नगरविकास विभाग, मंत्रालय

श्री. अनिष र. परशुरामे, उप सचिव

विभागीय अधिकारी

(१) श्री. शिवानंद टाकसाळे, जिल्हाधिकारी
(२) श्रीमती दिपा मुधोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा
(३) श्री. ज. भि. उगले, सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष
(४) कॅप्टन राजेंद्र भि. सनेर-पाटील, महाव्यवस्थापक, राज्य परिवहन विभाग मुंबई
(५) श्री. अतुल म. पंत, मुख्याधिकारी, नगरपरिषद, शेगांव
(६) श्री. कुशल एन. छाजेड, मुख्याधिकारी, नगर परिषद, मलकापूर
(७) श्री. संजीव ओहोळ, मुख्याधिकारी, नगरपरिषद, बुलढाणा
(८) श्री. प्रशांत शेळके, मुख्याधिकारी, जळगांव-जामोद, नगरपरिषद
(९) श्री. मदन खडसे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा
(१०) श्री. विजय यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
(११) श्री. पी. एस. जाधव, विभाग नियंत्रक, रा. प. विभाग, बुलढाणा
(१२) श्री. भिमराव ज.मुगदल, अपर इतर मागासवर्ग महामंडळ, बुलढाणा
(१३) श्री. दि. गो. दातारे, जिल्हा सामाजिक अधिकारी, बुलढाणा
(१४) डॉ. शिवाजी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा
(१५) श्री. मधुकर पटारे, प्रा. व्यवस्थापक, रा. प. विभाग, अमरावती

सदरहू बैठकीत इतर मागासप्रवर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष त्याबाबत बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव, जळगांव-जामोद, मलकापूर, बुलढाणा नगरपरिषद व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बुलढाणा विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा आणि प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, अमरावती तसेच समाजकल्याण विभाग, अमरावती व जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा बुलढाणा यांच्यामार्फत इतर मागासवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

चौथी बैठक

दिनांक ३ ऑगस्ट, २०१६

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

उपस्थिती

समिती प्रमुख

(१) डॉ. संजय कुटे, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(३) श्री. राजेश काशिवार, वि.स.स.
(४) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(५) श्री. नागेश पाटील-अष्टीकर, वि.स.स.
(६) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
(७) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.
(८) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. सुनिल झोरे, अवर सचिव (समिती)
श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी

सदरहू बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचार केला व किरकोळ दुरुस्त्यांसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई